रोजगार हमी योजना समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

पहिला अहवाल

(ठाणे जिल्हयाच्या संबंधात)

(अहवाल दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.
२०१५.

रोजगार हमी योजना समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

पहिला अहवाल

(ठाणे जिल्हयाच्या संबंधात)

(अहवाल दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती

(सन २०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(३) श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स.
(४) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(५) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.
(६) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(८) श्री. संतोष दानवे, वि.स.स.
(९) श्री. संदिपानराव भुमरे, वि.स.स.
(१०) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. नारायण पाटील, वि.स.स.
(१२) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स.
(१३) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स
(१४) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१५) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(१६) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(१८) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.
(१९) ॲड. राहूल कुल, वि.स.स.
(२०) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(२१) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
(२२) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(२३) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२४) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.
(२५) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, सह सचिव (२),
(३) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती
(सन २०१३-२०१४)

समिती प्रमुख :

(१) ॲड.सदाशिवराव पाटील, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री भाऊराव पाटील, वि.स.स.
(६) श्री दिलिपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(९) श्री राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री दिलिप वाघ, वि.स.स.
(११) श्री दीपक चव्हाण, वि.स.स.
(१२) प्रा. लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.
(१३) डॉ. सुधाकर भालेराव,, वि.स.स.
(१४) श्री हरिष पिंपळे, वि.स.स
(१५) श्री कृष्णा खोपडे, वि.स.स.
(१६) श्री विजयराज शिंदे, वि.स.स.
(१७) श्री दादाजी भुसे, वि.स.स.
(१८) कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री नितीन भोसले, वि.स.स.
(२०) श्री धैर्यशील पाटील, वि.स.स.
(२१) श्री सुभाष चव्हाण, वि.प.स.
(२२) श्री वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री रमेश शेंडगे, वि.प.स.
(२४) श्री अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री सुमंत गायकवाड,वि.प.स.
(२६) प्रा. अतुल देशकर, वि.स.स. निमंत्रित
(२७) श्री जयंत पाटील,वि.प.स. निमंत्रित

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री म.मु. काज, उप सचिव,

(३) श्री शशिकांत गायकवाड, अवर सचिव.
(४) श्री जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

रोजगार हमी योजना समिती
(सन २०१२-२०१३)

समिती प्रमुख :

(१) ॲड.सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री राहुल बोंद्रे, वि.स.स.
(६) श्री दिलिपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(९) श्री राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री दिलिप वाघ, वि.स.स.
(११) श्री दीपक चव्हाण, वि.स.स.
(१२) ***श्री ए.टी.पवार,वि.स.स.
(१३) *डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.
(१४) *श्री हरिष पिंपळे, वि.स.स
(१५) *श्री संजय भेगडे, वि.स.स.
(१६) *प्रा, अतुल देशकर,वि.स.स.
(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१८) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री विजयराज शिंदे, वि.स.स.
(२०) श्री प्रविण दरेकर, वि.स.स.
(२१) श्री सुभाष चव्हाण, वि.प.स.
(२२) श्री वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री रमेश शेंडगे, वि.प.स.
(२४) *श्री अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री भगवान साळुंखे, वि.प.स.
(२६) **डॉ. दिपक सावंत, वि.प.स., **निमंत्रित**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव,(समिती).

टीप :* डॉ.खुशाल बोपचे,सर्वश्री हरिष पिंपळे,संजय भेगडे व प्रा.अतुल देशकर,वि.स.स.यांची दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

** डॉ.दिपक सावंत,वि.प.स. यांची दिनांक २७ ऑगस्ट,२०१२ रोजी मा.सभापतीनी निमंत्रित सदस्य

म्हणून फेर नामनियुक्ती केली.

*** श्री लक्ष्मण जगताप,वि.स.स. याच्या ऐवजी श्री. ए.टी.पवार,वि.स.स.यांची दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

(पाच)

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना :	
१.	कामाचे वार्षिक नियोजन -	
२.	निधीचा पुरवठा व खर्च -	
३.	मजूरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च -	
४.	मजूरीचे वाटप -	
५.	अपूर्ण कामे -	
६.	गैरव्यवहाराची प्रकरणे -	
७.	विहीर कार्यक्रम -	
	परिशिष्ट :	
	(एक) - अपूर्ण कामे -	
	(दोन) - गैरव्यवहाराची प्रकरणे -	
	(तीन) - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त -	

(सात)

प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा पहिला अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे, २०१५ व २१ मे, २०१५ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१३-२०१४ या वर्षासाठी समिती गठीत केली. सन २०१२-१३ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी ठाणे येथे जिल्हा बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करताना-या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्हयातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

जिल्हा बैठकींमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करुन ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल, समितीचे सर्व सदस्य, जिल्हयातील लोक प्रतिनिधी, ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरुन समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे..

समितीने सदर अहवाल दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी विचारात घेतला व संमत केला.

विधान भवन
मुंबई
दिनांक: १६ जुलै, २०१५.

जयकुमार रावल
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

रोजगार हमी योजना समितीचा अहवाल

(१) कामाचे वार्षिक नियोजन :-

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी ठाणे येथे जिल्हा बैठका घेण्यात आल्या. बैठकींच्या वेळी समितीला "कामाचे वार्षिक नियोजन" या संबंधात लेखी स्वरुपात माहिती पुरविण्यात आली. त्यानुसार सन २००९-१० ते २०१३-१४(जून २०१३ अखेरची) या वर्षाच्या वार्षिक नियोजन आराखडयाचे स्वरूप खालील प्रमाणे असल्याचे नमूद केले आहे.

	वर्ष	कालावधी	सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी मान्य केलेले वार्षिक नियोजन आराखडे जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना सादर केल्याचा दिनांक	ग्रामपंचायत/ यंत्रणेच्या नियोजन आराखडयास जिल्हा परिषदेची मान्यता मिळाल्याचा दिनांक	मगांराग्रारोहयो आयुक्तांनी मान्यता दिल्याचा दिनांक व विलंब झाला असल्यास त्याची कारणे काय
(अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचना २००६ परिच्छेद ६ नुसार कामांच्या नियोजनांचे दिनांक १ एप्रिल, ते ३१ मार्च, या आर्थिक वर्षानुसार जिल्हयाचे वार्षिक आराखडे विहित मुदतीत तयार करण्यात आले आहेत काय? नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत?	२००९-१०	१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च,२०१०	२४ मार्च २००९	२४ मार्च २००९	-
	२०१०-११	१ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११	९ डिसेंबर, २००९	२५ नोव्हेंबर, २००९	-
	२०११-१२	१ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च,२०१२	९ डिसेंबर, २०१०	६ डिसेंबर, २०१०	
	२०१२-१३	१ एप्रिल, २०१२ ते ३१ मार्च, २०१३	७ जानेवारी, २०१२	२३ डिसेंबर, २०११	-
	२०१३-१४	१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४	१ फेब्रुवारी, २०१३	२२ जानेवारी, २०१३	

	वर्ष	स्पष्टीकरण
(ब) वरील कालावधीतील नियोजनाचे वार्षिक आराखडे तयार करण्याचे काम माहे डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्यास काही अडचणी आल्या असल्यास थोडक्यात स्पष्टीकरण द्यावे.	२००९-१०	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र ही योजना ठाणे जिल्ह्यात नव्यानेच सुरु झालेली असल्या कारणाने ग्राम स्तरावर ग्रामसभा घेणे, कामाचे नियोजन करणे या बाबीमूळे नियोजन आराखडा तयार करणेस विलंब झाला.
	२०१०-११	नियोजन आराखडा विहित वेळेत मंजूर झाला.
	२०११-१२	नियोजन आराखडा विहित वेळेत मंजूर झाला.
	२०१२-१३	नियोजन आराखडा विहित वेळेत मंजूर झाला.
	२०१३-१४	डिसेंबर अखेर पर्यंत जिल्हा परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा न झाल्यामुळे सन २०१३-१४ चा नियोजन आराखडा दिनांक १९/१०/२०१२ च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट १ नुसार जिल्हा परिषद, ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.ठाजिप/टे-१/काव१३९६, दि.३/१/२०१३ अन्वये आराखडा मा.उपायुक्त (विकास) कोकण विभाग, कोंकण भवन यांचेकडे पाठविला. तथापि जिल्हा परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २२/१/२०१३ रोजी झाली. त्यामध्ये नियोजन आराखडयास मंजुरी देण्यात आली.

(क) वरील कालावधीत नियोजनाचे वार्षिक आराखडे पूर्ण झाले असल्यास जिल्हा आराखडयाचे स्वरूप नमुद करावे.

सन २००९-१० च्या वार्षिक नियोजन आराखडयाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

अ.क.	कामाचे प्रकार	एकुण कामे (संख्या)	अंदाजित खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्य दिवस निर्मीती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५	६

(१)	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	४८०४५	९९३२९.९९	१०८१.४०	६५
(२)	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनिकरणासहित)	६१०	७४७.३९	७.९८	०.४९
(३)	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	१०९७	२५०९.५६	२०.७८	२
(४)	अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	८२६	१०९१.७६	९.३९	०.७२
(५)	पारंपारीक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	१८५८	५२२६.०५	५४.७९	३
(६)	भूविकासाची कामे	२३४९१	२४१६५.२४	३४४.७७	१५.८५
(७)	पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे	४९९	७२२.६६	७.१६	०
(८)	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	४८२१	१६८३८.२६	१४७.६	११.०५
(९)	केंद्र शासनाची चर्चा करून राज्य शासनाने ठरविलेली कामे	१४४६	१७९६.१५	११.६९	१
(अ) कृषि स्वरूपाची कामे:(मातीनाला बांध, मातीबांध,सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा,जैविक बांध, गॅबीयन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट, खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा)					
(ब) पाटबंधारे:(मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझर कालवा, गाव तलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नुतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण)					
(क) सामाजिक वनीकरण:(१). (पडीक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना, २.रोपवाटीका, ३.रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड)					
(ड) वनीकरण: (वनतलाव,स.स. चर/भु.स.स.चर, ट्रेंच कम माऊंट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स, जून्या वनतलावाचे नुतनीकरण, बांबू राझ्यांभोवती वर्तुळाकार चर, रायमुनिया/लेंटिना निर्मुलन करणे)					
(इ) सार्वजनिक बांधकाम :(इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणीपुरवठा योजनासाठीचे रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण/नुतनीकरण रस्त्याचे रूंदीकरण)					
	एकुण	८२६९३	१५२४२७.०६	१६८५.५६	

सन २०१०-२०११

अ.क्र.	कामाचे प्रकार				
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(७)
(१)	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	६८२५१	९१८५७.०७	६५२.३१	५८
(२)	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	१४५०	११५४.७९	८.०१	०.७३
(३)	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	१०८५	३४४६.०७	१९.०७	२.२
(४)	अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	१३६०	१६७०.९०	९.२३	१
(५)	पारंपारिक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	२३१६	७३३९.३३	५१.२०	५
(६)	भूविकासाची कामे	२८३७२	२४२७१.७३	२२३.१८	१५
(७)	पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे	१०६७	१२१८.४९	८.३५	०.८
(८)	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	२११३३	२२८४६.७२	१३०.५६	१४
(९)	केंद्र शासनाशी चर्चा करून राज्य शासनाने ठरविलेली कामे	१५८३२	४७९७.५८	२१.०८	३
(अ) कृषि स्वरूपाची कामे:(मातीनाला बांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, गॅबीयन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा)				
(ब) पाटबंधारे:(मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझर कालवा, गाव तलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नुतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण)				
(क) सामाजिक वनीकरण : (१.पडीक(गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना. २. रोपवाटीका, ३.रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड)				
(ड)वनीकरण :(वनतलाव,स.स.चर/भु.स.स.चर, ट्रेंच कम माऊंट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स,जून्या वनतलावाचे नुतनीकरण,बांबू राझ यांभोवती वर्तुळाकार चर, रायमुनिया/ लेंटिना निर्मुलन करणे)				
(इ)सार्वजनिक बांधकाम:(इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते,				

जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणीपुरवठा योजनासाठीचे रस्ते,रस्त्याचे मजबुतीकरण/नुतनीकरण रस्त्यांचे रूंदीकरण)				
एकूण	**१४०८६६**	**१५८६०२.६८**	**११२२.९९**	

सन २०११-२०१२

अ.क्र	**कामाचे प्रकार**				
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(७)
(१)	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	८२२२०	९९१३२.६६	७०३.२०	५३
(२)	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	२२५८	१५३४.८३	१०.६४	१
(३)	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	१३५६	३६७४.७३	२१.३१	२
(४)	अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	२५०२	२५८२.७६	१४.१४	१
(५)	पारंपारिक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	२६७६	८७०६.९३	६०.८३	५
(६)	भूविकासाची कामे	३१७५८	२८५८४.६६	२६२.०६	१५
(७)	पूरनियंत्रण,पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे	१३३०	१३६५.२३	९.०६	१
(८)	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	८६८४	३२४५८.९०	१८२.३४	१७
(९)	केंद्र शासनाशी चर्चा करून राज्य शासनाने ठरविलेली कामे	३६९३०	८६७३.००	३८.०९	५
(अ) कृषि स्वरूपाची कामे:(मातीनाला बांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, गॅबीयन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा)					
(ब) पाटबंधारे:(मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझर कालवा,गाव तलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नुतनीकरण, तलावातील गाळकाढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण)					
(क) सामाजिक वनीकरण : (१.पडीक(गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना. २. रोपवाटीका, ३.रस्त्याच्याबाजूस वृक्ष लागवड)					
(ड) वनीकरण :(वनतलाव,स.स.चर/भु.स.स.चर, ट्रेंच कम माऊंट,वृक्ष लागवड,रोपवाटीका, फायरलाईन वर्क्स, जून्या वन तलावाचे नुतनीकरण, बांबू राझ्यांभोवती वर्तुळाकार चर, रायमुनिया/ लेंटिना निर्मुलन करणे)					
(इ) सार्वजनिक बांधकाम:(इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणीपुरवठा योजनासाठीचे रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण/नुतनीकरण रस्त्यांचे रूंदीकरण)					
एकूण	**१६९७१४**	**१८६७१३.७०**	**१३०१.६७**		

सन २०१२-२०१३

अ.क्र	**कामाचे प्रकार**				
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(७)
(१)	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	२१७२८	३६३५९.९३	१८३.६१	४३
(२)	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	२०१९	३३८७.८३	१८.६३	४
(३)	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	६९७	८६.१४	०.४५	०.१०
(४)	अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	२०१४	३६२४.८३	१२.९८	४
(५)	पारंपारिक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	१०५५	१५०९.६४	९.२३	२
(६)	भूविकासाची कामे	१८३४४	१४७५५.२९	१०४.६७	१८
(७)	पूरनियंत्रण,पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे	६	३.३५	०.१०	०.००४
(८)	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	४०१७	२०८७८.९७	१०४.८५	२५
(९)	केंद्र शासनाशी चर्चा करून राज्य शासनाने ठरविलेली कामे	१०८४२	३६३६.२१	१९.१९	४
(अ) कृषि स्वरूपाची कामे: (मातीनाला बांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, गॅबीयन बंधारा,सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण, जलद बंधारा)					
(ब) पाटबंधारे:(मातीचे धरण,मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझर कालवा,गाव					

तलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नुतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण)				
(क)सामाजिक वनीकरण : (१.पडीक(गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना.२. रोपवाटीका, ३.रस्त्याच्याबाजूस वृक्ष लागवड)				
(ड)वनीकरण:(वनतलाव, स.स.चर/भु.स.स.चर, ट्रेंच कम माऊंट, वृक्ष लागवड,रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स, जून्या वनतलावाचे नुतनीकरण, बांबू राझ्यांभोवती वर्तुळाकार चर, रायमुनिया/ लेंटिना निर्मुलन करणे)				
(इ)सार्वजनिक बांधकाम:(इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणीपुरवठा योजनासाठीचे रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण/नुतनीकरण रस्त्यांचे रूंदीकरण)				
एकूण	**६०७२२**	**८४२४२.१९**	**४५३.७१**	

सन २०१३-२०१४					
अ.क्र	**कामाचे प्रकार**				
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(७)
(१)	जलसंधारण व जलसंवर्धन कामे	२४१६७	४११५३.०९	१९४.८०	३८
(२)	दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित)	४३०७	७४७८.४७	३८.७०	७
(३)	जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)	५६५	१३५०.६४	३.४५	१
(४)	अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे	५८२४	६१३६.५१	२३.३७	६
(५)	पारंपारिक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे	१७१८	१६१६.६६	८.४८	२
(६)	भूविकासाची कामे	११३२६	१३२९४.०२	७४.२४	१२
(७)	पूरनियंत्रण,पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे	१९७	१६१.३२	०.७०	०.१५
(८)	ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे	३९५०	२४२०३.८१	९८.०१	२२
(९)	केंद्रशासनाची चर्चा करून राज्यशासनाने ठरविलेली कामे	३२४६९	१२२७९.०२	५७.२६	११
(अ) **कृषि स्वरूपाची कामे:**(मातीनाला बांध, मातीबांध, सिमेंट नालाबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, गॅबीयन बंधारा, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंट खार जमीन विकास बंधारा, शेततळी, बोडी नूतनीकरण, नाला सरळीकरण,जलद बंधारा)				
(ब) पाटबंधारे:(मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझर कालवा, गाव तलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नुतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण)				
(क) सामाजिक वनीकरण: (१.पडीक(गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड व वैरण योजना. २. रोपवाटीका, ३.रस्त्याच्याबाजूस वृक्ष लागवड)				
(ड)वनीकरण:(वनतलाव,स.स.चर/भु.स.स.चर, ट्रेंच कम माऊंट, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फायर लाईन वर्क्स, जून्या वनतलावाचे नुतनीकरण, बांबू राझ यांभोवती वर्तुळाकार चर, रायमुनिया/ लेंटिना निर्मुलन करणे)				
(इ)सार्वजनिक बांधकाम:(इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, जोड रस्ते, स्मशानभूमी, पाणी पुरवठा योजनासाठी रस्ते, रस्त्याचे मजबुतीकरण/ नुतनीकरण रस्त्यांचे रूंदीकरण)				
एकूण	**८४५२३**	**१०७६७३.५४**	**४९९.०१**	

(ड) व्यक्तिगत लाभदायक योजनांची चालू वित्तीय वर्षाची माहिती					
अ.क्र.	कामाचे प्रकार	एकूण कामे (संख्या)	अंदाजीत खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्यदिन निर्मिती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(७)
१	**कृषि विभाग:**				
	फळबाग योजना	७५०४	१५१८.५१	५.६२	१.४१
	शेततळी	२४५	२६२.३०	०.९७	०.२४
	खाजगी बोडीची कामे	०	०	०	०
	मजगी (भातशेती)	५७८०	२८२४.३२	१७.४३	२.६२
	तुतीची लागवड	०	०	०	०
	बोडी नुतनीकरण	०	०	०	०
२	**जिल्हा परिषद:**				

	जवाहर विहिरींची कामे	०.००	०.००	०.००	०.००
	सिंचन विहिरींची कामे	३२१३.००	५४२२.४७	१८.४४	५.०३
३	**सामाजिक वनीकरण:**				
	खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड	०.००	०.००	०.००	०.००
	एकूण	**१६७४२.००**	**१००२७.६०**	**४२.४७**	**९.३०**

(इ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ५०% कामे ग्राम पंचायतीमार्फत करावयाची असल्याने पंचायत समिती निहाय मंजूर आराखडयांची माहिती देण्यात यावी.

गोषवारा

अ.क्र.	सन	एकूण कामे (संख्या)	अंदाजीत खर्च (लाखात)	अपेक्षित मनुष्यदिन निर्मिती (लाखात)	एकूण खर्चाची टक्केवारी
१	२००९-१०	५०८०४	८३२२२.५२	८९७.२८	५५
२	२०१०-११	८७११९	७२३९०.१९	४७७.२७	४६
३	२०११-१२	१२१९१८	९९८११.४७	६५०.४७	५३
४	२०१२-१३	३४६७८	३९७३४.८८	१९०.१	४७
५	२०१३-१४	५८६२७	४९८००.४८	२११.३९	४७

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, सन २०१३-१४ या वर्षाच्या कामाचे वार्षिक नियोजन काय केले आहे, याची सविस्तर माहिती द्यावी. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २०१३-१४ मध्ये वेगवेगळ्या यंत्रणांकडून प्रस्ताव मागवून पूर्ण असलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात आराखडा तयार केला. सदरहू वर्षाकरिता जलसंधारण व जलसंवर्धन कामे, दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनिकरणासहित), जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे), अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नवीनभूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे, पारंपरिक पाणीसाठ्याचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे, भूविकासाची कामे, पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे, ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे, केंद्र शासनाशी चर्चा करून राज्य शासनाने ठरविलेली कामे, अशा विविध प्रकारांतील ८४५२३ कामांचे नियोजन करण्यात आले आहे. सदर कामांची निवड ग्रामसभेत प्रस्ताव मंजूर करून केली आहे. सदर कामांसाठीचा अंदाजित खर्च १,०७,६७३.५४ लाख रूपये आहे. सदर वर्षात अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती ४९९.०१ आहे.

सदर प्रकरणी समितीने अशीही विचारणा केली की, या संदर्भात पूर्ण नियोजन केले आहे का?रोजगार हमी योजनेच्या कामांच्या नियोजनाच्या संदर्भात टप्पे ठरले आहेत. सदर टप्यांमध्ये काही तारखा ठरविल्या आहेत काय की, अमुक या तारखेला प्रस्ताव तयार करायचा, आराखडा तयार करायचा, तो मंजूर करायचा. याबाबत जिल्हाधिकारी यांनी होय असे सांगून पूढे अशी माहिती दिली की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्रनुसार दिनांक १५ ऑगस्ट या दिवशी ग्रामसभेत वार्षिक आराखडा मंजूर करून घेऊन, कार्यक्रम अधिकाऱ्यांना सादर करावयाचा असतो, दिनांक १५ सप्टेंबर या दिवशी कार्यक्रम अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला सादर करावयाचा असतो, दिनांक २ ऑक्टोबर या दिवशी पंचायत समिती गटनिहाय वार्षिक आराखडा तयार करून, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांना सादर करावयाचा असतो, दिनांक १५ नोव्हेंबर या दिवशी जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांनी जिल्ह्याचा वार्षिक

आराखडा व मजुरांच्या खर्चाचे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेला सादर करावयाचे असते, दिनांक १ डिसेंबर या दिवशी जिल्हा परिषद जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यास मंजुरी देते, दिनांक १५ डिसेंबर या दिवशी जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीत घ्यावयाच्या कामांची योजना (shelf) तयार करावयाचे असते, दिनांक ३१ डिसेंबर या दिवशी सर्व जिल्ह्यांनी त्यांचे मजुरांच्या मजुरीचे अंदाजपत्रक आयुक्त नरेगा यांना सादर करावयाचे असते व त्यांनी ते केंद्र शासनास मान्यतेसाठी सादर करावयाचे असते, जानेवारी महिन्यात केंद्र शासनाद्वारे सदर अंदाजपत्रकाचे परिक्षण व जिल्हाधिकाऱ्यांनी त्रुटींची पूर्तता करावयाची असते, फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय प्राधिकृत समितीची बैठक व राज्याच्या मजुरांच्या मजुरीच्या अंदाजपत्रकाला मान्यता घ्यावयाची असते, फेब्रुवारी व मार्च महिन्यांत मंजूर अंदाज पत्रक राज्यास वितरित करावयाचे असते व राज्याद्वारे माहितीनिहाय व जिल्हानिहाय त्याची माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली (MIS) मध्ये नोंद आणि त्यांची माहिती जिल्हा, गट व ग्रामपंचायतीस द्यावयाची असते, दिनांक ७ एप्रिल या दिवशी राज्यामार्फत वर्षाच्या सुरूवातीची शिल्लक केंद्र शासनास कळवायची असते आणि तेव्हा केंद्र शासन निधीचा पहिला हप्ता राज्यास वितरित करते. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आज ५ सप्टेंबर आहे, ५ सप्टेंबरला कोणती स्थिती असली पाहिजे? जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, पुढच्या वर्षाची म्हणजे सन २०१४-१५ या वर्षाची प्रक्रिया सुरू केली आहे. दिनांक १५ ऑगस्टला ग्रामसभेत वार्षिक आराखडा मंजूर करून घेऊन कार्यक्रम अधिकाऱ्यांना सादर केला आहे.

समितीने विचारणा केली की, किती ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन प्रस्ताव पाठविले आहेत ? या टप्यावर कार्यक्रम अधिकारी ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला सादर करेल असे अपेक्षित आहे. ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला आला पाहिजे. मागील काही वर्षांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तांनी मान्यता दिल्याचा दिनांक व विलंब झाला असल्यास त्याची कारणे काय आहेत, या संदर्भातील रकान्यामध्ये आपण कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. सन २००९-१०, २०१०-११, २०११-१२, व २०१२-१३ या वर्षांच्या कामाच्या वार्षिक नियोजनास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तांनी किती तारखेला मान्यता दिली याबाबतची माहिती दिलेली नाही. या संदर्भात खुलासा करण्यात यावा याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, माहिती पुस्तिकेच्या पृष्ठ १ वर माहिती दिलेली आहे. सन २००९ ते सन २०१३-१४ पर्यंत प्रत्येक वर्षाची माहिती दिलेली आहे. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, प्रारुप आराखडयात मान्यता दिल्यानंतर काय कार्यवाही केली? तसेच सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक नियोजन आराखड्यास दिनांक २२ जानेवारी, २०१३ रोजी जिल्हा परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस मान्यता देण्यात आली. परंतु जो तक्ता करण्यात आलेला आहे त्यामध्ये "मगांराग्रारोहयो आयुक्तांनी मान्यता दिल्याचा दिनांक व विलंब झाला असल्यास त्याची कारणे " या रकान्यात माहिती निरंक दाखविलेली आहे. आयुक्तांनी केव्हा मान्यता दिली व विलंबाचा दिनांक दिला असता तर समितीला ती माहिती समजली असती, परंतु ती माहिती दिलेली नाही. चालू वर्षाची माहिती द्यावयास पाहिजे होती. यासंदर्भात उपायुक्त, कोकण विभाग यांनी सांगितले की, नरेगा

सुरु झाली तेव्हा पासून नियोजन आराखडयास विभागीय आयुक्तांची मान्यता लागत नाही. जिल्हा परिषद स्तरावर मान्यता देण्यात येते. पूर्वी रोहयोच्या नियोजन आराखड्यास विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव मान्यतेसाठी येत होते. या संदर्भात नियोजन विभागाचे काय मत आहे? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो) यांनी सांगितले की, सन २०१२ पासून नागपूर येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे आयुक्तालय सुरु केले आहे. सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या वर्षासाठी आयुक्तालय नव्हते म्हणून सदर रकान्यातील माहिती निरंक दाखविण्यात आली आहे.

नियोजन आराखड्यास आयुक्तांची मान्यता लागत नाही असा शासन निर्णय असल्यास तो समितीस सादर करावा, असे सूचित केले असता उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय,कोकण विभाग यांनी सांगितले की, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये नमूद केलेले आहे की, " दिनांक १ जुलै ते ३१ ऑगस्ट पासून आराखडा मंजूर होईपर्यंत सर्व कार्यक्रम आखून दिलेले आहेत. त्या कार्यक्रमानुसार जर जिल्हा परिषदेने विहित वेळेत मान्यता न दिल्यास याबाबत ग्रामीण रोजगार हमी आयुक्त यांनी प्रस्तावास त्यांच्या अधिकारात मान्यता द्यावी. याची जबाबदारी उप आयुक्त (विकास) यांची राहील." समितीने पुढे अशी पृच्छा केली की, ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार जिल्हा परिषदेने मान्यता दिली नाही तर ग्रामीण रोजगार हमी आयुक्त यांनी त्यांच्या अधिकारात मान्यता द्यावयाची आहे. नियोजन आराखड्यास जिल्हापरिषदेने मान्यता दिली की नाही हे पाहण्याची जबाबदारी आपली नाही काय? हे सर्व पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे? त्यावर उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग यांनी शासन निर्णय वाचून दाखविला.

नियोजन आराखड्याचा प्रस्तावास विहित वेळेत मान्यता मिळाली की नाही हे पाहिले पाहिजे. ही गंभीर बाब आहे. आपण जे वाचून दाखविले त्यामध्ये प्रस्ताव आयुक्तांकडे पाठवू नये असे कुठेही म्हटलेले नाही. जिल्हा परिषदेने विहित वेळेत नियोजन केले नाही हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची नसून आयुक्त कार्यालयाची आहे. आपल्याकडे काहीही माहिती नाही, दोघांमध्ये समन्वय नाही, काय होत आहे हे कोणी पाहिले नाही असे कागदपत्र पाहिल्यानंतर लक्षात येते. या पुढील काळात दक्षता घ्यावी असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत आराखड्यास मान्यता दिल्यानंतर तो आराखडा आयुक्तांकडे पाठविणे अपेक्षित होते. तथापि तसे होऊ शकले नाही, या पुढे हा विषय गांभीर्याने घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

सन २००९-१० ते २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक नियोजन आराखड्याच्या विविध कामांवरील अंदाजित खर्च व एकूण खर्चाची टक्केवारी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही. जलसिंचन कालव्यांच्या कामांची टक्केवारी २ दाखविली आहे. ही टक्केवारी कशाप्रकारे दाखविली आहे, याबाबत खुलासा करण्यात यावा असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० ते सन २०१३-१४ या वर्षाच्या नियोजित आराखड्याची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये प्रत्येक वर्षामध्ये किती कामे नियोजित केलेली आहेत आणि त्यासाठी किती खर्च

अपेक्षित आहे, किती मनुष्यबळाची निर्मिती होईल याची टक्केवारी दिलेली आहे. तसेच एकूण रक्कम आणि अंदाजित टक्केवारी आहे.

पूरनियंत्रण, पूरसंरक्षणकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे इत्यादी कामांची एकूण संख्या ४९९ दाखविण्यात आली आहे. तर एकूण खर्चाची टक्केवारी "शून्य" दाखविण्यात आली आहे. एकूण ९ कामांचे प्रकार दिलेले आहेत. त्यातील कोणत्या कामांना प्राधान्य देण्यात येते? जलसंधारणांच्या कामांना जास्त प्राधान्य देण्यात येते काय? भू-विकासाची कामे केली आहेत काय व त्या कामाचे स्वरुप काय आहे? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एकूण खर्चाची टक्केवारी ०.०४ येत होती. रांऊड फिगर म्हणून शून्य दाखविली आहे. आकडेवारी राऊंडअप केल्यामुळे ती विसंगती दिसून येत आहे. तसेच जलसंधारणाच्या कामाबाबत दिनांक १९ ऑक्टोबर, २००६ रोजीचा शासन निर्णय आहे. जलसंधारण आणि मृदसंधारणाच्या कामाची विगतवारी करुन कामांचे नियोजन करायचे आहे. यंत्रणेने शासन निर्णयाप्रमाणे नियोजन केलेले आहे. त्याचप्रमाणे भू-विकासाची कामे घेतलेली आहेत. त्यामध्ये मसगीचे काम, भातबांधाची दुरुस्ती कामे, इत्यादी कामे घेण्यात येतात. मसगीच्या कामाचे स्वरुप काय आहे? असे समितीने विचारले असता, कृषी विकास अधिकारी यांनी सांगितले की, जमीन उंचसखल असेल तर ती सपाट करुन त्यावर शेती केली जाते. थोडक्यात जमिनीवर तीन टक्के उतार असेल तर ती सपाट करुन दिली जाते. यावर समितीने विचारणा केली की, यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होते काय? याबाबत कृषी अधिकारी यांनी शेतीच्या उत्पन्नात वाढ होते असे सांगितले समितीने पुढे अशीही पृच्छा केली की, सन २००९-२०१० या वर्षाच्या वार्षिक नियोजन आराखड्यात कामांची एकूण संख्या ८२ हजार ६९३ दाखविली आहे. ही सर्व कामे त्या वर्षात पूर्ण झाली आहेत काय? त्यावर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले की, सर्व कामे त्याच वर्षात सुरु होत नाहीत. यंत्रणा लोकांच्या मागणी प्रमाणे कामे घेते. सन २००९-१० मध्ये ३१ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २००९-१० मध्ये केंद्र आणि राज्य शासनाचा एकत्रित निधी ५९ कोटी ६९ लाख रुपये होता, त्यापैकी ३१ कोटी ७१ लाख रुपये खर्च केले आहेत.

एकूण मंजूर निधीपैकी २० कोटी रुपये खर्च केले नाहीत. तसेच सन २००९-१० या वर्षाकरिता जो अंदाजित खर्च दाखविलेला आहे त्यापैकी किती रक्कम खर्च केली, अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० मध्ये ३१ कोटी ७१ लाख रुपये खर्च केले. त्यावर समितीने विचारले की, पुस्तकात किती अंदाजित खर्च दाखविला आहे? यासंदर्भात उप जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, अंदाजे खर्च रुपये १,५२,४२७ लाख रुपये दाखविला आहे. समितीने पुढे विचारणा केली की, यापैकी किती रक्कम मिळाली आणि त्यापैकी किती रक्कम खर्च झाली? यावर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले की, केंद्र आणि राज्य सरकारकडून ५१ कोटी ६९ लाख रुपये मिळाले त्यापैकी ३१ कोटी ७१ लाख रुपये खर्च झाले. या संदर्भात समितीने असे नमूद केले की, १५०० कोटी रुपयांचे नियोजन करण्यात आले होते. त्यापैकी केवळ ५० टक्के खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे नियोजनाचा आराखडा व प्रत्यक्षात झालेला खर्च यामध्ये खूप फरक पडल्याचे दिसत आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी खुलासा केला की, यंत्रणांच्या मागणीच्या आधारावर निधीची मागणी केली जाते. प्रत्येक गावात व पाड्यात कामे सुरु करण्यासाठी मागणी केली जाते.

सन २००९-१०,२०१०-११,२०११-१२ व २०१२-१३ या चारही वर्षात तसेच झालेले आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० व २०१०-११ मध्ये जी कामे सुरु केली नव्हती ती कामे नवीन वर्षाच्या आराखड्यामध्ये घेण्यात आली आहेत. समितीने पुढे असे नमूद केले की, हे जरी खरे असले तरी नियोजन व प्रत्यक्षात झालेली कामे व त्यावरील खर्च यामध्ये खूप फरक पडलेला आहे. याचा अर्थ जिल्ह्याचे नियोजन चुकीच्या पध्दतीने होत आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, मजूरांचे नियोजन केल्यानंतर जास्तीत जास्त कामे सुरु करता यावी, जेणे करुन अंदाजपत्रक बरोबर असावे अवास्तव कामे वाढवू नये, अशी यापूर्वी भूमिका होती. त्यावर समितीने विचारले की, अंदाज व प्रत्यक्षात झालेला खर्च यामध्ये किती फरक असावा, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितले की, मागील वर्षात मजूरीवर झालेल्या खर्चापेक्षा पुढील वर्षाच्या बजेटमध्ये १० टक्के अंदाजित खर्च गृहित धरला जातो.

वार्षिक आराखडा खूप मोठा तयार करण्यात आल्यावर कामे जास्त होतात असे नाही. अवास्तव आराखडा तयार करण्यात आल्यानंतर शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीपेक्षाही कमी खर्च होत आहे. मागील वर्षी करण्यात आलेला खर्च, शासन स्तरावरुन आलेल्या सूचना त्याच्या आधारे खर्च होणे अपेक्षित आहे. बाकीच्या राज्यांकडून या योजनेसाठी भरपूर खर्च केला जातो. त्याप्रमाणे आपल्या राज्यात या योजनेवर खर्च करावा असे अपेक्षित आहे. मागील चारही वर्षाच्या बाबतीत कमी खर्च करण्यात आल्यामुळे या बाबीवर गंभीरपणे विचार केला पाहिजे. समिती कोणावर दोषारोप ठेवत नाही. परंतु समितीने वस्तुस्थिती निदर्शनास आणलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, मागील वर्षी मजूरीसाठी झालेल्या खर्चामध्ये १० टक्के वाढ करावी अशा मार्गदर्शक सूचना आहेत.

सन २००९-१० चा आराखडा तयार केला होता. त्यापैकी जिल्हा परिषदेमार्फत किती कामे चालू होती आणि किती कामे पूर्ण झाली याची माहिती द्यावी. वास्तविक नरेगाची ५० टक्के कामे झाली पाहिजे होती. जिल्हा परिषदेने केवळ १ टक्का खर्च केलेला आहे. याचा अर्थ जिल्हा परिषदेने नरेगा या योजनेला गंभीरपणे घेतलेले नाही. योजनेची अंमलबजावणी केलेली नाही. जिल्हा परिषद खर्च करण्यास उदासीन दिसून येते असे समितीने स्पष्ट केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेचे नियोजन ५५२ कोटी रुपयांचे होते. त्यापैकी ५.९४ कोटी रुपये खर्च झाला आहे. पुढील वर्षी सन २०१०-११ मध्ये ४६ टक्के, सन २०११-१२ मध्ये ५३ टक्के जिल्हा परिषदेने खर्च केला आहे. सन २०१२-१३ मध्ये ४७ टक्के, सन २०१३-१४ मध्ये ४७ टक्के खर्च केला आहे. साधारणपणे ५० टक्के खर्च करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोकणातील मुख्य पीक भात शेती असल्यामुळे या ठिकाणी शेतीच्या दुरुस्तीची कामे घेतली पाहिजे. विदर्भातही काही भागात भात शेती केली जाते. त्यामुळे या योजनेद्वारे भात शेतीची कामे करण्यात आल्यास त्याचा

शेतकऱ्यांना उपयोग होईल. कोकणामध्ये अशी कामे करता येतील. परंतु १५०० कोटी रुपयांपैकी ५० टक्केही खर्च करीत नाही. या तफावतीच्या बाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय गंभीर दिसत नाही. याबाबत नोंद घेतल्याचे समितीने नमूद केले.

खाजगी जमिनीवरील वृक्ष लागवडीची माहिती निरंक दर्शविली आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा. त्यावर उप संचालक, सामाजिक वनीकरण यांनी सांगितले की, जुन्या रोजगार हमी योजनेचा शासन निर्णय होता त्यातील तरतुदीनुसार खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड करता येत होती. परंतु एमआरईजीएसच्या शासन निर्णयामध्ये खाजगी जमिनीवरील वृक्ष लागवडीला वगळलेले नाही. दिनांक ९ डिसेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयामध्ये ही बाब वगळलेली आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागीय अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो) यानी सांगितले की, एमआरईजीमध्ये खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड करण्याची तरतूद करण्यात आली आहे. उपायुक्त (रोहयो), कोकण विभाग यांनी देखील सांगितले की, खाजगी वृक्ष लागवडीची तरतूद शासन निर्णयामध्ये आहे. त्यामुळे सर्व योजना नरेगा अंतर्गत केल्या जातात. तसेच उप संचालक, सामाजिक वनीकरण यांनीही सांगितले की, त्या निर्णयाप्रमाणे एमआरईजीएसमध्ये नियोजन केलेले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजना घेतलेल्या नाहीत. वैयक्तिक लाभाच्या योजना, फळबाग योजना, या दोन्ही योजना २ हेक्टरपर्यंत करता येतात. खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड करण्यात येऊ नये अशी शासन निर्णयामध्ये तरतूद आहे. जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड करता येत होती, एमआरईजीएसमध्ये करता येत नाही. यासंदर्भात उपायुक्त (रोहयो), कोकण विभाग यांनी सांगितले की, नरेगा अंतर्गत ग्रामपंचायतीच्या जमिनीवर, शासकीय जमिनीवर, निमशासकीय जमिनीवर फळबाग लागवड करण्याची तरतूद केलेली आहे.

समितीने दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी ठाणे जिल्ह्यास भेट दिली. त्या अनुषंगाने दिनांक २२ जानेवारी,२०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी भारत निर्माण राजीव गांधी सेवा केंद्र, ता.वाडा या कामाचे एकच अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना भाग-१ व भाग-२ करण्यात आले. ग्रामीण स्तरावर १० लाख रुपयांची मर्यादा असताना ११ लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या संदर्भात वित्तीय मर्यादेचे उल्लंघन करण्यात आले आहे. या संदर्भातील माहिती विभागाकडून खालील प्रमाणे प्राप्त झाली आहे:-

भारत निर्माण राजीव गांधी सेवा केंद्र भवन कोने, ता.वाडा या कामाचे अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये करण्यात आले. अंदाजपत्रकाची एकूण रक्कम रुपये १९.८९ लक्ष इतकी आहे.

शासनाचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१० च्या पत्राअन्वये राजीव गांधी सेवा केंद्र भवनाची अंदाजपत्रकीय रक्कम त्यावेळच्या प्रचलीत दरसूचीनुसार रुपये १० लक्ष निर्धारित करण्यात आली होती. या कामाच्या अंदाजपत्रकानूसार कुशल व अकूशल यांचे प्रमाण अनुक्रमे ८०:२० आहे. तथापि, मग्रारोहयोच्या दरसूचीतील

मजूरीमध्ये सन २००९ -१० पासून रु.६८/- ते रुपये १४५/- एवढी वाढ झालेली आहे. ती साधारणत: सरासरी १००% पेक्षा जास्त आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसूचीत सन २००९-१० पासून दरवर्षी सरासरी १० ते १५% प्रमाणे एकूण ४० ते ५०% दरवाढ झालेली आहे.

उपरोक्त दोन्ही दरसूचीचा विचार करता दिनांक २५ फेब्रवारी, २०१० च्या शासनाच्या पत्रान्वये निर्धारित केलेली भारत निर्माण राजीव गांधी भवनाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १० लक्ष मध्ये सन २०१२-१३ ला साधारणपणे १८ ते २० लक्षच्या दरम्यान येत असून त्यानूसार सदरचे अंदाजपत्रक बनविलेले आहे.

उपरोक्त अंदाजपत्रक हे भाग १ (पाया, विटकाम, दरवाजे व खिडक्या, फ्लोरींग इत्यादी) व भाग २ (आर सी सी स्लॅब, प्लास्टर, रंगकाम व इतर अनूषंगीक बाबी) दोन भागात विभागणी करण्यात आली आहे. तथापि, दोन भाग मिळून एकच काम आहे व सदर कामावर झालेला खर्च एकाच वर्ककोडवर ऑनलाईन करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रक दोन उपभागात बनविल्यामुळे अनावधानाने दोन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या. परंतु एकाच कामाला अनावधानाने दोन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान झाल्याची चूक लक्षात आल्यामुळे सदर कामाचा खर्च ऑनलाईन करताना एकाच कामावर टाकण्यात आलेला आहे. भविष्यात या प्रकारची चूक पूनश्च होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, जे स्पष्टीकरण दिलेले आहे ते संयुक्तिक वाटत नाही. याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, समितीने वाडा तालुक्यातील भारत निर्माण राजीव गांधी सेवा भवनास भेट दिली होती. त्यावेळी समितीस या कामाचे दोन अंदाजपत्रक तयार केले असल्याचे निदर्शनास आले. समितीने ही बाब निदर्शनास आणल्यानंतर त्या संदर्भातील सदर माहिती घेण्यात आली. ठाणे जिल्ह्यामध्ये बऱ्याच ठिकाणी राजीव गांधी भवन मंजूर झाले आहेत. परंतु फक्त वाडा येथेच राजीव गांधी सेवा भवनाच्या कामाचे दोन अंदाजपत्रक तयार करण्यात आले. परंतु नरेगा वेबसाईटवर एकाच कामाच्या अंदाजपत्रकाचा समावेश केलेला असल्यामुळे एकच काम दिसत आहे. फक्त या कामाचे दोन वेगवेगळे अंदाजपत्रक केलेली आहेत. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू अंदाजपत्रक दोन उप विभागात बनविल्यामुळे अनवधानाने दोन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या, प्रशासनाच्या दृष्टीने ही गंभीर बाब आहे, याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, राजीव गांधी सेवा केंद्र भवनासाठी १० लाख रुपयांची मर्यादा होती. परंतु मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाला, केंद्र शासनाने ही मर्यादा काढलेली आहे. त्यावेळी १० लाख रुपये मर्यादा होती, त्यामुळे त्या मर्यादेचे उल्लंघन करणे चुकीचे आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे हे मान्य करुया परंतू स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे की, "अनावधानने दोन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या" हे समितीला योग्य वाटत नाही. समितीने कामाला भेट दिली त्यावेळी तेथे बांधकाम साहित्य पडलेले होते, स्लॅब टाकण्यात आले नव्हते, रस्ता सरळ नव्हता. ती जागा समाधानकारक होती असेही दिसून आले नाही. हे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी काय

नियोजन केले आहे, असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, समितीने कामाला भेट दिली त्यावेळी ते काम प्रगती पथावर होते, आता ते काम पूर्ण होत आले आहे. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, हे काम १० लाख एवढया रकमेमध्ये होणार नव्हते, मग ते काम कशाप्रकारे पूर्ण करण्यात येणात आहे? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९ च्या डीएसआर प्रमाणे हे काम १० लाख रुपयांत पूर्ण होणार नव्हते. १९ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या रकमेमध्ये काम पूर्ण होईल. समितीने विचारणा केली की, ६०:४० च्या प्रमाणामध्ये काम कसे बसले? याबाबत कार्यकारी अभियंता यानी सांगितले की, हे ८०:२० चे काम आहे. तसेच विभागीय सचिव यांनी सांगितले की, रोहयोच्या कामामध्ये ६०:४० चे पालन होणे आवश्यक आहे. परंतु नरेगामध्ये तसे नाही. लाईन डिपार्टमेंट असले तरी तालुक्याला ६०:४० चे प्रमाण आहे. ८० टक्के कुशल काम झालेले आहे.

ठाणे जिल्ह्यातील वाडा हा आदिवासी तालुका आहे. आदिवासी भागासाठी असलेला निधी बऱ्याच वेळा व्यपगत होतो. वाडा तालुक्यासाठी आदिवासी निधी असताना सुध्दा ते काम रोहयोमध्ये का घेतले? दुसरे काम घेणे आवश्यक होते. आदिवासी उप योजनेचा निधी संपला असेल आणि हे काम घेतले असेल तर समितीचे काही म्हणणे नाही असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, वाडा तालुक्यामध्ये गाव पातळीवर बैठक घेतली होती आणि गावातील लोकांच्या मागणीप्रमाणे राजीव गांधी भवन बांधण्यात आले आहे. नरेगाचा निधी खर्च करायचा होता अन्यथा तो परत गेला असता. समितीने पुढे असे स्पष्ट केले की, कामाचे नियोजन करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती आहे. कायद्याने जो निधी मिळाला होता तो प्रथम खर्च झाला किंवा कसे हे पहावयास पाहिजे होते. ठाणे हा आदिवासी भाग असल्यामुळे त्या जिल्ह्याला भरपूर अनुदान आहे. जिल्हा परिषदेने केलेले काम चांगले आहे, त्याबाबत समितीचा आक्षेप नाही.

वार्षिक नियोजन आराखडे तयार करीत असताना प्रत्यक्षात झालेली कामे व त्यावरील खर्च यात मोठी तफावत होती. आराखड्यांची योग्य प्रकारे तपासणी करण्याची कारणे काय आहेत व ही जबाबदारी कोणाची आहे? अशी समितीने विचारणा केली त्यावर जिल्हाधिकारी यानी सांगितले की, पूर्वी रोजगार हमी योजना होती. सन २००९ पासून नरेगा योजना सुरु झाली. त्या नुसार ग्रामपंचायत स्तरावर नियोजन करून गावातील लोकांच्या मागणीनुसार ग्रामपंचायतींनी नियोजन आराखडे तयार करून ते सादर करावयाचे होते. त्या आधारावर लेबर बजेट तयार करून कामे केली जातात. ही कामे लोकांच्या मागणीनुसार केलेली आहेत. कार्यालय त्यांना कामे सुचवू शकत नाही. तसेच मोठमोठी कामे करावीत अशी त्यात अट टाकलेली नव्हती. या संदर्भात नियोजन करीत असताना जिल्हा स्तरावरून ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे असे समितीने स्पष्ट केले असता,जिल्हाधिकारी यानी सांगितले की, जिल्हा स्तरावरून ग्रामपंचायतींना आराखडे तयार करण्यासंबधी वेळावेळी मार्गदर्शन केले जाते.

सन २०१०-११ ते २०१३-१४ मध्ये नियोजित खर्चाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी असण्याची कारणे काय आहेत? समितीने पुढे अशी विचारणा केली, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितले की, सन २००९-१० मध्ये ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या कामांची संख्या कमी होती. मागील २ वर्षांपासून नियोजन खर्चाची आकडेवारी ४७ टक्के इतकी आहे. ५० टक्के नगरक्षेत्र आणि वनांची जास्त संख्या या २ कारणांमुळे कामे करण्यासाठी अडचणी येत आहेत. तसेच विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ७५ ते ८० टक्के कामे ग्रामपंचायतीच्या स्तरावर केली जातात. डोंगराळ व वन क्षेत्रात अनेक कामे असल्यामुळे कामे करण्यासाठी मर्यादा येतात. काही डोंगराळ भागामध्ये झोपडपट्टी भाग जास्त आहे. विभागाचा रोख सर्वप्रथम या झोपडपट्टया हटवून त्यांचे पुनर्वसन करणे, तसेच, स्थलांतरित लोकांना सोयी सुविधा मिळवून देण्याकडे जास्त आहे. समितीने असे नमूद केले की, आदिवासी भागामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त निधी खर्च झालाच पाहिजे. आदिवासी भागामध्ये जर नियोजन केलेला पैसा खर्च होत नसेल तर मग नियोजन, योजना व तरतूद कशासाठी केली जाते ?त्यावर विभागीय सचिवानी सांगितले की, ग्रामपंचायत स्तरावर एकूण निधीच्या ५० टक्के रक्कम कमीत कमी खर्च होणे आवश्यक आहे, अशा प्रकारच्या काटेकोर सूचना विभागीय स्तरावर देण्यात येतील.

● अभिप्राय व शिफारशी :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या वार्षिक नियोजनाची परिपूर्ण माहिती देण्यात आली नाही. कामाच्या वार्षिक नियोजनाबाबत जिल्हा परिषद व आयुक्तांचे कार्यालय यामध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. सन २००९-१० ते २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक नियोजन आराखडयात विविध कामांवरील अंदाजित खर्च व एकूण खर्चाची टक्केवारी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही. नियोजनाचा आराखडा व प्रत्यक्षात झालेला खर्च यामध्ये बराच फरक असल्याने जिल्ह्याचे नियोजन चूकीच्या पध्दतीने झाल्याचे समितीचे मत आहे. अवास्तव आराखडा तयार करण्यात आल्यावर कामे जास्त होतात असे नाही. अवास्तव आराखडा तयार करण्यात आल्यानंतही शासनाकडून प्राप्त झालेला निधी सन २००९-१० ते २०१३-१४ या चारही वर्षात कमी खर्च होणे ही गंभीर बाब असून शासनस्तवरून आलेल्या सुचनांच्या आधारे खर्च होणे अपेक्षित आहे, तथापि, याबाबत जिल्ह्यातील यंत्रणा उदासिन असल्याचे दिसून आले.

भारत निर्माण राजीव गांधी सेवा केंद्र (ता.वाडा) या कामाचे एकच अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना भाग-१ व भाग-२ करण्यात आले. ग्रामीण स्तरावर १० लाख रुपयांची मर्यादा असताना ११ लाख रुपयांचे अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे. सदरहू अंदाजपत्रक दोन उपविभागात बनविल्यामुळे अनवधानाने दोन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या. ही अत्यंत गंभीर बाब असून वित्तीय मर्यादेचे उल्लंघन केले असल्याचे स्पष्ट होते, ही बाब निश्चितच योग्य नाही.

कामाचे वार्षिक नियोजन शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करणे आवश्यक असताना संबंधित यंत्रणांकडून अनेक त्रुटी राहिल्या असल्याने शासनाच्या आदेशाचे पालन केले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे

जिल्ह्यातील कामांचे वार्षिक नियोजन असमाधानकारक असल्याचे समितीचे स्पष्ट मत असून यापुढे संबंधित यंत्रणांनी शासनाच्या विहीत मार्गदर्शक तत्वानुसार कामे घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न करावेत अशी समितीची शिफारस आहे.

(२) निधीचा पुरवठा व खर्च :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "निधीचा पुरवठा व खर्च" यासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००९-१० व २०११-१२ या वर्षांसाठी मागणी केलेल्या रकमेपेक्षा जास्त निधी मंजूर असणे.सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये कमी रक्कम मंजूर असण्याची कारणे काय आहेत? शासनाकडून मागणीपेक्षा जास्त रक्कम कशी मिळाली? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० मध्ये ७६ कोटी १० लाख रूपयांच्या लेबर बजेटची मागणी केली आहे. सन २००९-१० साठी दिनांक २० जुलै, २००९, दिनांक ४ ऑगस्ट, २००९, दिनांक २१ ऑगस्ट, २००९ या तारखांना १९ कोटी ७८ लाख रूपयांची मागणी वेळोवेळी केली आहे, त्यातील ५१ कोटी ७५ लाख रूपये शासनाकडून मिळाले आहेत. निधी शेवटपर्यंत खर्च होईल असे गृहीत धरून शासनाने निधी दिला. सन २०११-१२ साठी देखील ७८ कोटी ९७ लाख रूपये लेबर निधी शासनाकडून मिळाला. खर्चाप्रमाणे वाटप करण्यात येत असते. २० मार्चला ३९ कोटी रूपये मिळाले. केंद्र शासनाकडून वेळोवेळी निधी मिळाला. निधीचे सन २०११-१२ मध्ये कामे कमी होती. सन २०११-१२ पासून सर्व बाबी संतुलित व सुसंगत केल्या आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००९-१० मध्ये ५० कोटी रूपये मंजूर होतात. सन २०११-१२ मध्ये ६० कोटी रूपये मंजूर होतात. मागणी कमी असताना जास्त रक्कम मंजूर कशी काय झाली? एका वर्षी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर होणे आणि दुसऱ्या वर्षी कमी प्रमाणात निधी मंजूर होणे, हे बरोबर नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, नियोजन आराखडा व लेबर बजेट यांची सांगड घालून त्याच्या आधारे निधी मिळतो.

सन २००९-१० मध्ये मागणी कमी केली आणि शासनाने जास्त पैसे दिले असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० व २०१०-११ मध्ये कामे कमी प्रमाणात होती. शासन लेबर बजेटच्या तुलनेत पैसे देते. सन २००९-१० मध्ये ७६ कोटी रूपये लेबर बजेट होते. केंद्र शासनाकडून पैसे आले, ते राज्य शासनाने वर्ग केले. शासनाकडे निधीची मागणी केली आणि शासनाकडून निधी देण्यात आला. यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, सन २००९-१० मध्ये ५१.७५ कोटी रूपये मंजूर रक्कम दाखविली आहे, ती रक्कम खर्च केली का, तसेच खर्चाविना शिल्लक राहिलेले २० कोटी रूपये प्रत्यार्पित केले आहेत काय, याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, शासनाकडून ५१ कोटी ७५ लाख रूपये मिळाले, त्यापैकी ३१ कोटी ७१ लाख

रूपये खर्च झाले. उरलेली रक्कम पुढील वर्षाची प्रारंभिक शिल्लक असते, ती रक्कम प्रत्यार्पित केली जात नाही. प्रश्नावलीमध्ये त्या संदर्भातील रकाना नसल्यामुळे ती रक्कम नमूद केली नाही. सन २०१०-११ च्या सुरूवातीला ४१.९७ लाख रूपये रक्कम दाखविलेली आहे असे समितीने नमूद केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदर वर्षात शासनाकडून मिळालेली ती रक्कम आहे. समितीने पुढे विचारणा केली की, पूर्वीच्या वर्षी शिल्लक राहिलेली रक्कम पुढील वर्षाची प्रारंभिक शिल्लक असते, असे म्हणत असाल तर ती रक्कम येथे दाखविलेली नाही. ती रक्कम लेखी जमाखर्चाला आली पाहिजे होती. मिळालेली रक्कम व शिल्लक असलेली रक्कम असे रकाने केले पाहिजे होते. गेल्या वर्षी मंजूर झालेल्या रकमेतून खर्च झालेली रक्कम वजा करून राहिलेली रक्कम पुढील वर्षाची प्रारंभिक शिल्लक म्हणून दाखविली पाहिजे होती. परंतु, तसे केलेले नाही. सन २०१०-११ मध्ये मंजूर झालेल्या रकमेची बेरीज केली असता त्यामध्ये उर्वरित रक्कम दाखविली नसल्याचे दिसत आहे. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, नमुना प्रपत्रामध्ये वेगळा रकाना नव्हता, प्रारंभिक शिल्लक २० कोटी रूपये आहे.

समितीने स्पष्ट केले की, ती रक्कम शिलकीमध्ये दाखविली नाही, म्हणजे ती अधिक झाली का? ती रक्कम अखर्चितच राहिली पाहिजे. पुढील वर्षी अखर्चित रक्कम समायोजित झाली पाहिजे. प्रत्येक वर्षी असे झाले आहे का? प्रत्येक वर्षाची अखर्चित रक्कम किती आहे? प्रत्येक वर्षीच्या उर्वरित रकमेचा हिशोब कुठे आहे? येथे २० कोटी रूपये दिसून येत नाहीत, त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, समितीने सांगितल्याप्रमाणे, प्रारंभिक शिल्लक यामध्ये रिफ्लेक्ट होत नाही. प्रत्येक वर्षी केंद्र शासन, राज्य शासन यांनी मंजूर केलेल्या निधीची रक्कम रकाना २ मध्ये दर्शविण्यात आली आहे. प्रारंभिक शिलकीचा समावेश करून पूर्ण रक्कम दिसावयास पाहिजे होती. प्रत्येक वर्षी मंजूर झालेली रक्कम रकाना २ मध्ये घेतली आहे. प्रत्येक वर्षीचा प्रारंभिक शिलकीचा वेगळा आकडा आहे. सन २००९-१० मध्ये प्रारंभिक शिल्लक १० कोटी रूपये होते, सन २०१०-११ मध्ये २७ कोटी रूपये होते, सन २०११-१२ मध्ये २१ कोटी रूपये होते, सन २०१२-१३ मध्ये १७ कोटी रूपये होते, सन २०१३-१४यावर्षी ७ कोटी रूपये आहेत. प्रारंभिक शिल्लक प्रत्येक वर्षी पुढे नेण्यात येत असते, ती शिल्लक सुरक्षित आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, नमुना प्रपत्र रोजगार हमी योजनेप्रमाणे केला आहे. एमआरईजीएसचा विचार करून वेगळे नमुना प्रपत्र तयार केले पाहिजे, नेहमीच अशी अडचण निर्माण होत आहे.

लेखी जमाखर्चाच्या नियमाप्रमाणे रक्कम येथे दर्शविणे गरजेचे होते. शुध्दीपत्रकामध्ये देखील ते दाखविलेले नाहीत. २० कोटी रूपये पुढील कॉलममध्ये मागील वर्षीच्या मंजूर रकमेतील उर्वरित रक्कम असे म्हणून दाखवू शकला असता, ती रक्कम अंतर्भूत करून स्पष्टपणे दाखविले गेले पाहिजे होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, हे सर्व जूने नमुना प्रपत्र असल्यामुळे झाले आहे. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ती दुरूस्त करून समितीला सादर करण्यात येईल. समितीने पुढे स्पष्ट केले की, सन २०१०-११ मध्ये किती रकमेची मागणी केली, हेच दाखविलेली नाही. फक्त मिळालेली रक्कम १३३८.७३ लाख रूपये दाखविली आहे.

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या वेळी समितीला देण्यात आलेल्या माहितीच्या अनूषंगाने समितीने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सन २००९-२०१० ते सन २०१२-२०१३ या प्रत्येक वर्षात मागील वर्षातील शिल्लक निधीची रक्कम किती? प्रत्येक वर्षी शासनाकडे मागणी केलेली निधीची रक्कम, शासनाकडून प्राप्त झालेली रक्कम व शिल्लक रक्कम इत्यादिंची सविस्तर माहिती समितीला सादर करावी. त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षाची रक्कम शिल्लक असल्याने नवीन वर्षी केंद्र शासनाकडून रकमेची मागणी करण्यात आली नव्हती. तसेच, एएफएस प्रणालीनुसार एका स्ट्रीमलाईनमध्ये केंद्राकडून निधी राज्याकडे पाठविला जाण्याची नवीन पध्दत रुढ झालेली आहे. तसेच, याकरिता आता राज्यामध्ये बँकेच्या लेखी जमार्खचाच्या पध्दतीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. बीडीओ आता पुढील रकमेच्या मागणीकरिता डिजिटल स्वाक्षरी करुन टप्याटप्याने निधीची मागणी करीत असतात. यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, केंद्र शासनाकडून प्रत्येक हप्त्याप्रमाणे दरवर्षी विहित रकमेची आयएफएस प्रणालीच्या माध्यमातून मागणी करण्यात यावी. तसेच, पूर्वीची रक्कम विहित मुदतीत प्रभावीपणे खर्च करण्याचा प्रयत्न राज्य शासनाच्या विभागीय यंत्रणेने करणे आवश्यक आहे.

● अभिप्राय व शिफारशी

सन २००९-२०१० ते २०११-२०१२ या वर्षी मागणीपेक्षा जास्त निधी मंजूर करणे आणि सन २०१२-२०१३ ते २०१३- २०१४ या वर्षी कमी निधी मंजूर होणे यासंदर्भात संबंधितानी केलेला खुलासा समितीला संयुक्तीक वाटत नाही. शासनाच्या विविध भागांकडून प्राप्त झालेला निधी व खर्च झालेली रक्कम याचे योग्यप्रकारे तपशिल ठेवण्यात आले नसल्याने समितीस प्राप्त निधी व खर्च याची सुसंगत माहिती प्राप्त झाली नाही. "सन २००९-१० मध्ये ५१.७५ कोटी रूपये शासनाकडून प्राप्त झाले, त्यापैकी ३१.७१ कोटी रूपये खर्च झाले. उर्वरित रक्कम पुढील वर्षाची प्रारंभिक शिल्लक असते ती रक्कम २० कोटी रूपये शिल्लक दाखविणे आवश्यक होते, परंतु सदर रक्कम शिलकीमध्ये दाखविण्यात आली नाही, तसेच शुध्दीपत्रकामध्ये देखील ती रक्कम दाखविण्यात आली नाही. त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करते". तरी यापुढे प्रत्येक वर्षी केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीची रक्कम विहित मुदतीत प्रभावीपणे खर्च करण्याचा प्रयत्न शासनाच्या विभागीय यंत्रणेकडून करण्यात यावा. या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे, याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(३) मजूरांच्या सोई सवलतींवर करण्यात आलेला खर्च :-

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "मजूरांच्या सोईसवलतींवर करण्यात आलेला खर्च" या संदर्भात समितीनी विचारणा केली की, विभागीय व्यवस्थापक, ठाणे व विभागीय व्यवस्थापक, वन विभाग, डहाणू या यंत्रणेने मजूरांच्या सोयीसवलतींवर ३ टक्क्यांपेक्षा जास्त निधी खर्च करण्याची कारणे काय आहेत? काही ठिकाणी ३ टक्क्यांपेक्षा जास्त खर्च केला आहे.

साडे सहा टक्क्यांपेक्षा जास्त खर्च केला आहे.तर काही ठिकाणी समितीने विचारलेल्या प्रस्तुत प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी कार्यकारी अभियंता किंवा अधीक्षक अभियंता स्तरावरील कोणताही अधिकारी उक्त बैठकीस हजर नसल्याने समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. समितीची परवानगी न घेता बैठकीस गैरहजर राहणे, ही गंभीर बाब आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय स्तरावर आवश्यक ती कारवाई करावी.

समितीने बैठकीच्या सुरूवातीला विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, ठाणे, यांनी सांगितले की, सन २०१३-१४ या वर्षासाठी १५ लाख ८४ हजार रुपये मंजूर करण्यात आले. माहे जून २०१३ पर्यंत मजूरांच्या सोयीसुविधेसाठी ५४ हजार इतका खर्च झाला आहे. ही टक्केवारी ३.४१ येते. झाड-सफाईंसाठी २५ मजूर कामावर होते. त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी खर्च झाला आहे. महिलांमार्फत पाणी पुरवठा करण्यात आला आहे. बैलगाडीमार्फत पाणी पुरवठा केलेला नाही.

मजूरांच्या सोयी सुविधांकरिता दिलेल्या टक्केवारीपेक्षा कमी खर्च करु नये. परंतु जे निकष ठरवून दिलेले आहेत त्याचे पालन झाले पाहिजे. मजूरांच्या सोयी सुविधांकरिता तीन टक्केपेक्षा जास्त खर्च होऊ नये अशी अपेक्षा आहे. अर्धा टक्का जास्त खर्च झाला तर तो गुन्हा नाही, परंतु निकषाप्रमाणे तीन टक्के खर्च होणे अपेक्षित आहे असे समितीने स्पष्ट करून पुढे अशी विचारणा केली की, डहाणू वन विभागाचा देखील तीन टक्केपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. त्याबाबत देखील अशीच परिस्थिती आहे काय? विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग,ठाणे यानी सांगितले की, दूरवरुन पाणी आणावे लागत असल्यामुळे जास्तीचा खर्च झालेला आहे. परंतु या पुढे काळजी घेण्यात येईल. तसेच डहाणू वन विभागासंदर्भात देखील तशीच परिस्थिती असल्याचे मान्य केले.

कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभागीय व्यवस्थापक, ठाणे, विभागीय व्यवस्थापन, वन विभाग, डहाणू या यंत्रणेने मजूरांच्या सोयी सवलतीवर केलेल्या खर्चाची तपशिलवार माहिती देण्यात यावी अशी समितीने सुचित केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सन २०१३-१४ मध्ये मुरबाड तालुक्यातील नाला सरळीकरणाची ४ कामे करण्यात आली. या ४ कामांवर एकूण २.३६ लक्ष इतका खर्च झालेला असून मजूरांच्या सोयी सुविधांवर रु.०.०५ लक्ष इतका खर्च हत्याराचे व अवजारांचे भाडे व हत्यारांना धार लावणे या कामावर झालेला असून सदर खर्च २.१५ टक्के इतका येतो. उर्वरित खर्च मजूरांच्या सोयीसुविधांवर ४.२१ टक्के इतका खर्च झालेला आहे. मजूरांच्या सोयी सुविधांवर नजरचुकीने हा खर्च एकत्रित दाखविण्यात आलेला आहे. नाला सरळीकरणाच्या कामाकरिता पाणी आणावे लागते. हे पाणी मजूरांनी दूरवरून विना वाहन स्वत: चालत जाऊन आणलेले आहे. पाण्याकरिता मजूर कमी पडले त्यामुळे मजूर नेमून त्यांच्याकडून नाला सरळीकरणाच्या कामाकरिता पाणी आणून घेतलेले आहे. वन विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार २५ मजुरांकरिता १ मजूर ठेवणे अनिवार्य आहे तसेच कामावरील मजूरांसाठी करण्यात आलेला पाणीपुरवठा, बैलगाडी अथवा टँकरने केलेला नसून महिलांच्या मार्फतच शिर ओझ्याने केलेला आहे. वनीकरणाची कामे ही अत्यंत दुर्गम भागात असल्यामुळे पाण्याचा स्त्रोत हा लांब अंतरावर असल्यामुळे फारच दूर अंतरावरुन पाणी आणावे लागले. त्यामुळे एखाद्या कामावर २५ पेक्षा कमी

मजूर असले तरी एकापेक्षा जास्त मजूर लावण्यात आले. तसेच सदरचे काम उन्हाळयात केल्यामुळे पाणी अधिक प्रमाणात उपलब्ध करुन द्यावे लागले. वरील सर्व कारणामुळे मजुरांच्या सोयी सवलतीवर झालेला खर्च २.७० टक्के पेक्षा जास्त झालेला आहे. तसेच या संदर्भात विभागीय सचिव यांनीही असे सांगितले की, नरेगा व मग्रारोहयो या योजना भविष्यात राज्यामध्ये सर्वाधिक किंवा अधिकाधिक व्यापक होत जाणार आहेत. या योजनांचे कार्य, यश, स्वरुप महाराष्ट्राकरिता उपयुक्तच ठरणार आहेत. मजूरांना काम, विकास कामांची पुर्तता त्यातून साधला जाणारा औद्योगिक व इतर विकास याचे गुणोत्तर उत्तरोत्तर वाढत जाणार आहे.

● अभिप्राय व शिफारशी :

मजूरांच्या सोईसवलतीवर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार खर्च होणे अपेक्षित आहे. परंतु समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सन २०१३-१४ या वर्षात ३ टक्यांपेक्षा जास्त रक्कम मजूरांच्या सोई सवलतींवर खर्च करण्यात आली आहे. मजूरांच्या सोई सुविधा करीता तीन टक्कयापेक्षा जास्त खर्च होऊ नये अशी अपेक्षा आहे. तसेच जिल्ह्यातील विविध यंत्रणानी शासन धोरणानुसार विहित मर्यादेत मजुरांना सोई सवलती पुरविण्याबाबत योग्यती काळजी घेतलेली नाही ही बाब गंभीर आहे. अत: पुढील कालावधीत संबंधित यंत्रणेने याची दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) मजूरीचे वाटप :-

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "मजूरीचे वाटप" या संदर्भात समितीने विचारणा केली की, मजूरांच्या मजूरी वाटपास विलंब होण्याची कारणे काय आहेत, मजूरांना मजूरीचे वाटप होण्यासाठी दोन आठवडे, तीन आठवडे, चार आठवडे, पाच-सहा आठवड्यांचा कालावधी का लागतो? मजूरी वाटपास काही अडचणी येत असतील तर तसे सांगावे. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ठाणे जिल्हयातील अनेक तालुके दुर्गम भागात आहेत. ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, तलासरी या तालुक्यांत नरेगाची कामे मोठ्या प्रमाणात होतात. परंतु येथील दळणवळणाची सुविधा पाहिली तर या तालुक्यांमध्ये बँकाची संख्या फार कमी आहे. तसेच पोस्टाचे डिस्ट्रीब्युशन देखील कमी आहे. आता रोहयोची मजूरी बँकामार्फत होत असल्यामुळे व या ठिकाणी बँकांची संख्या कमी असल्याने मजूरीचे वाटप होण्यास अडचणी येत आहेत. जिल्ह्यातील प्रमुख बँकांच्या म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब बँक या बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटून महत्वाच्या गावामध्ये एका व्यक्तीची नियुक्ती करुन मजूरांचे वेतन द्यावे असे सांगितले आहे. त्यांच्याशी सतत पाठपुरावा सुरू आहे. मागील कालावधीत १५ हजार मजूरांचे राष्ट्रीय बँकेत खाते उघडून दिलेले आहे. पोस्टामध्ये कमी मनुष्यबळ असल्यामुळे मजूरी मिळण्यास उशीर होतो. या संदर्भात तत्कालीन

जिल्हाधिकाऱ्यांनी पोस्टाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. काही स्तरावर सहकार्य मिळत नसेल तर ते निदर्शनास आणून दिलेले आहे.

यासंदर्भात ई-मस्टर अनिवार्य केलेले आहे. ई- मस्टरमुळे कोणत्या भागात मजूरी देण्यास उशीर झाला या बाबतची सर्व माहिती उपलब्ध होऊ शकेल. भविष्य काळात देशांतर्गत ई-फंड मॅनेजमेंट सिस्टीम होईल. या सर्व गोष्टीसाठी थोडा वेळ लागेल. ठाणे जिल्ह्यांतील काही तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कामे होत आहेत. एका अभियंत्याकडे १०० ते २०० कामे असतात. त्यांना प्रत्येक कामाची पाहणी करुन अहवाल द्यावा लागतो. हा भार खूप जास्त आहे. त्यामुळे अहवाल देण्यास कधी कधी वेळ होतो. तसेच बॅकांकडून आणि पोस्टाकडून पेमेंट होण्यास उशीर होतो. त्यामुळे मजूरांना मजूरी मिळण्यास उशीर होतो. ही सर्व कारणे असली तरी सुध्दा मजूरांना विहित वेळेत मजूरी देण्याबाबत निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

या संदर्भातील अधिनियमाचा विचार केला तर मजूरांना १५ दिवसांच्या आत मजूरी दिली पाहिजे. मजूरांना वेळेवर मजूरी मिळण्यासाठी जे प्रयत्न करीत आहात, तो हेतू समिती समजू शकते. तथापि समितीने ठाणे जिल्ह्यातील आमदारांची आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये सांगण्यात आले की, बँका शून्य खाते उघडण्यास नकार देतात. बँकांच्या अधिकाऱ्यांशी बैठक होईल त्यावेळी त्यांना शून्य खाते उघडण्याबाबत कल्पना द्यावी. नियमाप्रमाणे १५ दिवसांच्या आत मजूरी मिळाली पाहिजे. या ठिकाणी काही प्रकरणांमध्ये मजूरी मिळण्यासाठी चार-पाच आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी लागलेला दिसत आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मजूरांना वेळेत मजूरी मिळण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील.

सन २००९-१० मध्ये ३४५ प्रकरणांमध्ये मजूरी मिळण्यास चार आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. तर सन २०१०-११ मध्ये ४२६, सन २०११-१२ मध्ये ८९६, सन २०१२-१३ मध्ये १४८१ आणि सन २०१३-१४ मध्ये १५६ प्रकरणांमध्ये मजूरी मिळण्यास चार आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. ज्यांनी उशिरा मजूरी दिली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००६ पासून नरेगा योजना सुरु झाली. मागील तीन-चार वर्षापासून प्रत्येक वर्षी कामाची संख्या वाढलेली आहे. मजूरांची मजूरी देण्यास जाणूनबुजून उशीर केला असे निदर्शनास आले त्या प्रकरणामध्ये संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. तालुका स्तरावर प्रत्येक महिन्याला उप जिल्हाधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी आढावा घेत असतात.

ज्या प्रकरणांमध्ये मजूरी मिळण्यास चार-पाच आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे त्या मजूरांना मजूरी मिळाली आहे काय, मजूरांना वेळेत मजूरी न मिळण्याचे प्रमाण वाढले, परंतु संबंधितांवर कारवाई करण्याचे प्रमाण वाढले काय? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद यांनी सांगितले की, मजूरीचे वाटप उशिरा होण्यासंदर्भात गट विकास

अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी मजूरीचे वाटप उशिरा होण्याचे मुख्य कारण पोस्टाचे दिलेले आहे. तसेच कामाची संख्या वाढल्यामुळे हजेरी पटांची संख्या देखील वाढते. ई-मस्टर सुरु केल्यास मजूरीचे वाटप होण्यास उशीर होणार नाही. नियमाप्रमाणे दोन आठवड्यांमध्ये मजूरी मिळाली पाहिजे त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. ज्यांनी मजूरी देण्यास उशीर केला त्याबाबत उप जिल्हाधिकारी यांनी विचारणा केली काय? असे समितीने विचारले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सांगितले की, यामध्ये मुख्यत्वे कारण पोस्टाचे आहे.

सन २०१२-१३ मध्ये साधारणत: २५०० प्रकरणांमध्ये मजूरी मिळण्यास चार-पाच आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. त्या संदर्भात संबंधितांवर काय कारवाई केली, असे समितीनी विचारले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सांगितले की, सन २०१२-१३ मध्ये ग्रामपंचायत स्तरावर एकूण १३ हजार ५६३ हजेरीपटांची संख्या होती आणि ९३६ हजेरीपट होते. सर्वच तालुक्यांमध्ये मजूरी मिळण्यास विलंब झालेला नाही. काही तालुक्यांमध्ये विलंब झालेला आहे आणि विलंबाचे मुख्य कारण म्हणजे बँक आणि पोस्ट आहे.

समितीने पुढे असे स्पष्ट केले की, मजूरी देण्यास विलंब करणाऱ्यांवर काय कारवाई केली, मजूरी वाटपामध्ये विलंब होऊ नये यासाठी बैठका घेतल्या काय, १५ दिवसामध्ये पेमेंट करण्याचे शासनाचे आदेश असताना जिल्हयात मजूरीचे वाटप करण्यास ५ व ६ आठवडे विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या २६०० आहे. या विलंबाबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यानी कोणती भूमिका पार पाडली आहे, या विलंबाबाबत किती कर्मचाऱ्यांना वा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा दिल्या आहेत? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सांगितले की, दरमहा जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर गट विकास अधिकाऱ्यांची बैठक घेतली जाते. मजूरीचे वाटप करण्यासाठी विलंब झालेल्या हजेरीपटांच्या संदर्भात विभागाच्या स्तरावर, तालुका स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर बैठक घेतलेल्या आहेत. दुर्गम व डोंगराळ भागात बँकांची संख्या कमी आहे, पोस्टांची संख्या कमी आहे. त्याशिवाय नरेगासाठी शासनाने स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली नाही.

पोस्टाचे जाळे निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषदेने पत्र व्यवहार केला आहे काय, किती वेळा पत्र व्यवहार केला आहे, अशी समितीने विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सांगितले की, जिल्हा व तालुका स्तरावरुन पत्र व्यवहार केलेला आहे. ठाणे जिल्हयामध्ये नरेगाची कामे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्याकडे सोपविलेली नाहीत. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे यांच्याकडे या कामांची जबाबदारी दिलेली आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना ग्रामपंचायतींवर कारवाई करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार कार्यकारी अभियंत्यांना आहे काय, त्यांच्याकडे केवळ देखभाल करण्याचे काम दिलेले आहे. ग्रामीण भागातील मजूरांना दीड-दीड महिने पगार मिळत नसेल तर ते रोजगार हमी योजनेच्या कामावर कसे येतील?

ग्रामीण भागातील मजूरांना संध्याकाळी मजूरी मिळाली तर ते रात्रीचे जेवण तयार करु शकतील. अशा मजूरांना इतक्या विलंबाने मजूरी मिळत असेल, तर ही बाब अतिशय गंभीर आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी मजूरीला झालेल्या विलंबाचा विषय गंभीरतेने घ्यावा. आपण ज्या पदावर काम करीत आहात त्या पदावरील जबाबदारी लक्षात घेऊन काम करणे अपेक्षित आहे, आपणास उत्तर देण्यासाठी अडचण येत असेल तर संबंधित गट विकास अधिकाऱ्यांना उत्तर देण्यास सांगावे असे समितीने नमूद केले, त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सांगितले की, जिल्हा स्तरावरील समन्वय बैठकीमध्ये हा विषय घेतलेला आहे. नरेगासंबंधी दरमहा बैठका होत असतात. समितीने पुढे असे निदर्शनास आणून दिले की, ज्या लोकांनी काम केलेले नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही. ६-६ आठवडे मजूरी वाटपाची प्रकरणे प्रलंबित असताना यासंबंधी साधी विचारणा सुध्दा केलेली नाही. बैठका घेण्यात येणे हा कामकाजाचा भाग झाला. परंतु या बैठका घेऊन सुध्दा मजूरांचे ५-६ आठवडे पेमेंट झालेले नाही. अशा ग्रामपंचायतींकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून विचारणा केली आहे काय, या सर्व हजेरीपटांचे पेमेंट झाले आहे काय? असे समितीने विचारले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सांगितले की, सर्व हजेरीपटांचे पेमेंट झालेले आहे. समितीने पुढे असे स्पष्ट केले की, पुढील काळामध्ये मजूरी वाटपाला विलंब होणार नाही यासाठी सतर्क राहावे आणि कर्तव्य भावनेतून जबाबदारी पार पाडावी. तसेच २६०० हजेरी पटाची संपूर्ण माहिती समितीला सादर करावी . गट विकास अधिकॉयांनी किंवा ज्या संबधित अधिकाऱ्यांनी मजूरी वाटपासाठी विलंब केलेला आहे त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या वेळी २६०० हजेरीपटांच्या मजूरी वाटप करण्यास पाच ते सहा आठवडे विलंब झालेला असल्याने त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर केलेल्या कार्यवाहिची संपूर्ण माहिती समितीला सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालील प्रमाणे आहे:-

सन २००९-२०१० ते २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषद यंत्रणा यांचे मार्फत १५५१ हजेरीपट व कार्यान्वयीन यंत्रणा यांचेमार्फत ४३४ हजेरीपट असे एकूण १९८५ हजेरीपटांच्या मजूरी वाटपास पाच ते सहा आठवडे विलंब झालेला असल्याने सबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना ९९ कारणे दाखवा नोटीसा, ६९ ज्ञापन व ८५ कर्मचारी यांना समज देऊन त्यांचे सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात आलेली आहे. मगांराग्रारोहयो अंतर्गत शासन निर्णय नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो/२००८/प्र.क्र.३७/रोहयो-१० मंत्रालय, दिनांक १८/०५/२००९ कामाची मजूरी बँक/पोस्टामार्फत वितरीत करणे अनिवार्य करण्यात आले. त्यामुळे ठाणे जिल्हयात अस्तित्वात असलेल्या बँका व पोस्ट कार्यालये पाहता योजने अंतर्गत काम करणारे मजूर ग्रामीण भागात असल्यामुळे व ग्रामीण भागात बँकांची संख्या नगण्य असल्याने या जिल्हयात मजूरांची मजूरी पोस्टामार्फत वाटप करण्यात येते. ठाणे जिल्हयातील बँकेमध्ये मजूरांचे एकूण खाते ५०१७९ व पोस्टात १९६४०३ असे एकूण २४६५८२ खाते उघडण्यात आलेले आहे. त्यापैकी ८०% मजूरांचे खाते पोस्टात आहेत.

सब पोस्ट ऑफीसमध्ये मजूरांच्या मजूरीची रक्कम खात्यामध्ये जमा करणेसाठी पाठविली असता सब पोस्ट मास्तर त्यांचे विभागीय पोस्ट कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येत असे. त्यानंतर विभागीय पोस्ट कार्यालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर सब पोस्ट ऑफीस मधील पोस्टमन यांचे मार्फत मजूरांना मजूरी वितरीत केली जात असे या पध्दतीस लागणाऱ्या वेळेमुळे मजूरी वाटपास विलंब होत असे.

मगांरारोहयोच्या कामाच्या मानाने पोस्टातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे मजूरांना विहित वेळेत मजुरी प्राप्त होण्यास अडचणी निर्माण होत असल्याने मजुरी वाटपास विलंब होत असे.

तसेच तांत्रिक मनुष्यबळ अपुरे असल्याने कामांचे मोजमाप करणे, मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणे इत्यादी बाबी वेळेत न झाल्याने विलंब झालेला आहे.

सद्य:स्थितीत ठाणे जिल्हयात सर्व तालुक्यांमध्ये मस्टर ट्रॅकर प्रणाली, ई-मस्टर, ई-एफएमएस या प्रणाली द्वारे व त्यावरील मजूरांची मजूरी वाटप करण्यात येत असल्यामुळे मजूरांची मजूरी तात्काळ जमा करण्यात येते. या प्रणालीमुळे मजूरांची मजूरी वाटपास यापुढे विलंब होणार नाही.

समितीला देण्यात आलेल्या माहितीच्या अनूषंगाने दिनांक २२ जानेवारी,२०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याशी नियमाप्रमाणे आवश्यक असेल तेथेच कठोर वर्तन करावे, अन्यथा त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होऊन त्याचा परिणाम त्यांच्या कामावर होऊ शकतो. ज्या उद्दिष्टाकरिता त्यांना नेमलेले आहे, त्या उद्दिष्टय पूर्तीमध्ये कसूर राहता कामा नये. अधिकारी/कर्मचारी यांच्या मनामध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे उपयोगाची नाही असे समितीने स्पष्ट केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितले की, सद्य:स्थितीत ठाणे जिल्हयात सर्व तालुक्यांमध्ये मस्टर ट्रॅकर प्रणाली, ई-मस्टर, ई-एफएमएस या प्रणालीव्दारे हजेरीपट व त्यावरील मजूरांची मजूरी वाटप करण्यात येत असल्यामुळे ती तात्काळ जमा करण्यात येते. या प्रणालीमुळे मजूरांची मजूरी वाटपास यापुढे विलंब होणार नाही. तांत्रिक मनुष्यबळ अपुरे असल्याने कामांचे मोजमाप, पुस्तिकेत नोंद इत्यादी बाबी वेळेत न झाल्याने विलंब झालेला आहे. त्यावर समितीने असे स्पष्ट केले की, एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चूकीकरिता कनिष्ठ कर्मचाऱ्याला जबाबदार ठरवून त्याच्यावर जबाबदारी निश्चित करता कामा नये. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, मग्रारारोहयो अंतर्गत कामाची मजूरी बँक/पोस्टामार्फत वितरित करणे अनिवार्य करण्यात आले. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या बँका व पोस्ट कार्यालये पाहता योजनेअंतर्गत काम करणारे मजूर ग्रामीण भागात असल्यामुळे व ग्रामीण भागात बँकांची संख्या नगण्य असल्याने या जिल्ह्यात मजूरी पोस्टामार्फत करण्यात येते. ठाणे जिल्हयातील ८० टक्के मजूरांचे खाते पोस्टात व २० टक्के मजूरांचे बँकेमध्ये आहेत.

कनिष्ठ व वरिष्ठ अधिका-यांनी कामामध्ये चूक केली तर ज्याप्रमाणे त्यांच्या विरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई केली जाते. त्याचप्रमाणे चांगले काम केले तर नियमाप्रमाणे त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणेही आवश्यक आहे. तसेच मोबाईल व्हॅन बँकेची मागणी केल्यास नाबार्डकडून मोबाईल व्हॅन मिळू शकेल असे

समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, रोहयोवरील मजूरांचे लवकर पेमेंट होण्याच्या दृष्टीने बँकेसोबत बैठक घेण्यात येत असते. बँकेसोबत पत्र व्यवहार सुरु केले आहेत. बँकेचा एक कर्मचारी येथे कार्यालयात बसवून त्याच्याकडून हेडक्वार्टर्सला ऑन लाईन ट्रान्झॅक्शन करण्यात येते. अशा प्रकारे मजूरांचे पेमेंट लवकर होण्याच्या दृष्टीने पत्र व्यवहार सुरु केले आहेत. त्यामुळे पाच-सहा आठवड्याने पेमेंट होण्याचे प्रकार खूप कमी झाले आहेत. काही ठिकाणी कर्मचाऱ्याकडून मस्टर नोंदविण्यास उशीर झालेला आहे, त्या प्रकरणी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिल्या आहेत. त्यानंतर विभागीय सचिव यांनी सांगितले की, मजूरांची मजूरी मिळण्यास विलंब लागण्याची दोन कारणे आहेत. एक कारण म्हणजे मोजमाप पुस्तिकेचे आहे आणि दुसरे कारण बँक किंवा पोस्टामधून पेमेंट होण्यास उशीर होत आहे.

● अभिप्राय व शिफारशी :

रोजगार हमी योजनेवरील मजूरांना मजूरी वेळेवर मिळण्याच्या कार्यवाहीवर योजनेची यशस्वीतता अवलंबून असते. जिल्ह्यात या योजनेच्या कामांवर काम करीत असलेल्या मजूरांना चार ते पाच आठवड्यानी मजूरी मिळत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले, ही अत्यंत गंभीर बाब आहे. वास्तविक पाहता रोजगार हमी वरील मजूरांना काम केल्यानंतर नियमाप्रमाणे १५ दिवसाच्या आत मजूरी मिळाली पाहिजे. मगांराग्रारोहयो अंतर्गत कामाची मजूरी बँक/पोस्टामार्फत वितरित करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तथापि, जिल्ह्यातील अनेक तालूके दुर्गम भागात असून तेथे दळणवळणाच्या साईसुविधांची कमतरता, बँकाची कमी संख्या व पोस्टामध्ये मनुष्यबळ कमी असल्याने मजूरी वाटपास विलंब होत असल्याचे संबधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर स्पष्ट केले. तसेच अपूरे मनुष्यबळ असल्याने कामाचे मोजमाप, पुस्तिकेत नोंद इ. बाबी वेळेत न झाल्याने विलंब झालेला आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता शासनाने याबाबत त्वरीत योग्यती दखल घेऊन तेथील दुर्गम भागात दळणवळणाची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सत्वर कार्यवाही करण्यात यावी व मजूरांच्या मजूरीचे वाटप विहीत कालमर्यादेत होण्यासाठी शासनाने या भागात मोबाईल बँकींगची व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.

(५) अपूर्ण कामे :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "अपूर्ण कामे" या संदर्भात ऽसमितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्या अंतर्गत असलेला बेलवली (ढाढरे) ते भिंगुर्ली या रस्त्याच्या कामाला दिनांक १ नोव्हेंबर, २००८ रोजी तांत्रिक मान्यता मिळाली होती. या रस्त्याच्या कामावर ५ लाख ७९ हजार रुपये खर्च केला आहे. यानंतरच्या सर्व रस्त्यांच्या कामांच्या शेऱ्यामध्ये "पावसामुळे काम बंद आहे" असे नमूद केलेले आहे. या कामांवर लाखो रुपये खर्च इ

ालेला आहे. काही कामे सुरु केली आहेत, काही थांबविलेली आहेत. ही सर्व रस्त्यांची कामे पुढील काळात पूर्ण केली आहेत काय, अखर्चित निधी खर्च केला आहे काय आणि सध्या या रस्त्यांच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० मध्ये शहापूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाची २ कामे प्रलंबित होती. या कामासंबंधीत यंत्रणेने असे निदर्शनास आणले आहे की, तेथे माती भरावाचे काम करणे बाकी आहे. तसेच खडी फोडण्यासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. हे काम अकुशल कामात मोडते. परंतु त्यांनी ते काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुसरे काम त्या भागातील लोकांच्या विरोधामुळे अपूर्ण राहिलेले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, यंत्रणेने रस्त्याचे कुशल काम पूर्ण करुन ठेवले आहे. परंतु अकुशल काम अपूर्ण ठेवले आहे. त्या रस्त्यांचे पुढे काय झाले, हा रस्ता सध्या अस्तित्वात आहे की वाहून गेला आहे, त्या रस्त्यावरून गाडी जाऊ शकते का, या बाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी सांगितले की, या रस्त्यावर मातीकाम झालेले आहे सदर रस्त्यावरून गाडी जाऊ शकते.

अपूर्ण राहिलेल्या सर्व रस्त्यांच्या कामांबाबत प्रशासन गंभीर दिसत नाही. अकुशल काम अपूर्ण ठेवावयाचे, कुशल काम करुन घ्यावयाचे, त्यामुळे संपूर्ण रस्त्याचे काम अपूर्ण राहते, वाहतूक सुरु करता येत नाही. लोकांना त्या रस्त्याचा उपयोग करता येत नाही. त्यामुळे झालेला खर्च वाया जातो, कामकाजाची ही पध्दत रोजगार हमी योजनेला घातक आहे. अनेक कामांच्या बाबतीत "पावसामुळे काम बंद आहे" असे नमूद केलेले आहे. रस्त्यांच्या कामावर एक तृतीअंश खर्च करुन पुढे काहीच काम केले जात नाही, ही वाईट परिस्थिती आहे. अधीक्षक अभियंता हे सुध्दा खालच्या स्तरावरील माहितीवर अवलंबून राहतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेबरोबर बसून चर्चा केली पाहिजे. काम दुसऱ्या यंत्रणेकडे वर्ग झाले असेल तर त्याचा आढावा घेतला पाहिजे. शासनाचा पैसा खर्च केल्यानंतर तो वाया जात असेल तर लोकप्रतिनिधी म्हणून समिती सदस्यांना प्रश्न विचारावा लागणारच. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी उपजिल्हाधिकारी, रोहयो व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणते नियोजन केले आहे, तसेच मनोर-विक्रमगड या रस्त्याच्या कामाला दिनांक २५ मार्च,२०११ रोजी तांत्रिक मान्यता दिली आहे असे लेखी माहितीमध्ये नमूद केलेले आहे. या रस्त्याचे काम अपूर्ण राहिले असल्यामुळे ४० मिनिटांच्या प्रवासासाठी दीड तास लागत आहे. या रस्त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी, असे समितीने सागितले असता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांनी नमूद केले की, रोजगार हमी योजनेंतर्गत या रस्त्याच्या बाजूपट्टीचे काम घेण्यात आले होते. पावसाळ्यानंतर या रस्त्याचे काम सुरु करण्यात येणार आहे.

शहापूर तालुक्यातील बेलवली (ढांढरे) ते भिंगुर्ली या रस्त्याचे अंदाजपत्रक १७ लाख रुपयांचे होते. हे काम पूर्ण करावयाचे नव्हते तर त्यावर ५ लाख रुपये खर्च का केला, सन २०११ मध्ये हे काम बंद झाले होते. त्या नंतर दोन पावसाळे होऊन गेले आहेत. या रस्त्याच्या कामासाठी आतापर्यंत झालेला खर्च वाया गेला आहे, काम अपूर्ण राहिल्यामुळे लोकांना त्या रस्त्याचा उपयोग करता आलेला नाही. संबधीत अधिकारी केवळ औपचारिकता पूर्ण करीत आहेत. त्यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यानी सांगितले की, मार्च, २०१४ पर्यंत अपूर्ण कामे पूर्ण करुन घेण्यात येतील. या रस्त्यांबाबतची माहिती साक्षीच्या वेळी देण्याबाबत समितीने सूचित केले तसेच काही

रस्त्यांची काम छोट्या छोट्या कारणांमुळे म्हणजे मातीच्या भरावामुळे, पिचिंगमुळे अपूर्ण राहिलेली आहेत. ही कामे लवकर पूर्ण करण्यात यावी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपूर्ण कामांच्या संदर्भात कशा प्रकारे प्रगती करता येईल ते पहावे असेही नमूद केले. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००९-१० व २०१०-११ मध्ये कामे पूर्ण झालेली नाहीत. अपूर्ण कामांच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि जिल्हयाच्या इतर यंत्रणांच्या जिल्हा विभाग प्रमुखांशी चर्चा करून या संदर्भातील आराखडा तयार करण्यात येईल आणि अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या संदर्भात कालबध्द कार्यक्रम आखून समितीला या संदर्भातील अहवाल सादर करण्यात येईल.

समितीला देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक ८५ ते ८८, ९१ ते ११० व १२४ ते १२९ येथे दर्शविलेली वाडा, विक्रमगड व डहाणू येथील कामे सुरू न करता खर्च झाल्याचे दर्शविण्यात आले असल्याने याबाबत खुलासा करावा. तसेच सन २०१०-११ चा आढावा घेण्यात येत असून वाडा येथे गातेस खानिवली केळठण रस्ता सुधारणा करणे कि.मी.५/०० ते ६/०० ता. वाडा या कामाची अंदाजपत्रकीय किंमत २४.६० लाख दाखविली आहे, त्यास तांत्रिक मान्यता दिनांक २४ मार्च,२०११ व प्रशासकीय मान्यता दिनांक २६ मार्च,२०११ रोजी घेतली असल्याचे दाखविले आहे. परंतु, काम सुरू झाल्याची व काम बंद झाल्याची तारीख दाखविलेले नाही किंवा काम का बंद झाले याचे कारणही सांगितलेले नाही. काम बंद का झाले या संदर्भातील कारण नमूद केले पाहिजे होते. या ठिकाणी खर्च मात्र ८.१२ लाख दाखविला आहे. काम झालेले आहे, असे एकाही ठिकाणी लिहिलेले नाही. कामास मान्यता आहे, पण इतर माहिती देण्यात आलेली नाही. सर्व पृष्ठांवर तोच प्रकार आहे. मजूर उपलब्ध नसल्यामुळे काम बंद किंवा अपूर्ण असल्यास मजूर कामावर येण्यासाठी कोणते प्रयत्न केले, आतापर्यंत कामावर झालेला एकूण खर्च, अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून अग्रक्रमाने पूर्ण करण्यासाठी केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च, शेरा व अभिप्राय असे अनेक कॉलम्स दिले आहेत. परंतु, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती भरण्यात आलेली नाही असे समितीने विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीबाबत दोन गोष्टी लक्षात आणून देण्यात येत आहेत की, विहिरींची कामे बंद असण्याचे कारण तेथे खडक लागलेला आहे. वैयक्तिक लाभाच्या योजना पूर्ण होतील, ही सर्व अपूर्ण कामे आहेत, अपूर्ण कामे राहण्याची कारणे खडी नेण्यास मजूर न मिळणे, दुर्गम भाग असल्यामुळे तेथे रोड रोलिंगची कामे न होणे, अशी कारणे आहेत. समितीने विचारले की, दिलेल्या माहितीच्या तक्त्यामध्ये तसा उल्लेख केलेला नाही. कामाचे अंदाजपत्रक तयार केले, तांत्रिक मान्यता दिली, प्रशासकीय मान्यता दिली, वर्कऑर्डर दिली. मात्र, येथे काम सुरू आहे की बंद आहे, हे नमूद केले नाही. यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांनी सांगितले की, सदर कामास दिनांक २६ मार्च,२०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली व दिनांक १४ नोव्हेंबर,२०१२ ला हे काम सुरू झाले.

समितीने पुढे स्पष्ट केले की, या बाबी माहीत असतानाही समितीसमोर अपूर्ण माहिती सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर बाबतीत त्यांच्यावर स्वतंत्ररित्या कारवाई करावी, अशी सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत आहे. पुस्तिकेतील संपूर्ण माहिती निरंक ठेवली आहे. या संदर्भात संबंधितांकडून खुलासा घेण्यात यावा. माहीत असूनही समितीला अपूर्ण माहिती देणे, ही गंभीर बाब आहे. कामे पावसाळ्यानंतर सुरू करावयाची आहेत असे येथे सांगितले आहे,

काही ठिकाणी माती भरावाचे काम पूर्ण, खडीकरण व मोऱ्यांचे काम बाकी, मजुरांअभावी व पावसामुळे काम बंद असल्याचे कारण दिले आहे. ही कामे दोन वर्षांपूर्वीची आहेत, या संदर्भात आढावा घ्यावा. असे सुचित केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या अनुषंगाने दिनांक २२ जानेवारी,२०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, अपूर्ण कामांची सद्य:स्थिती काय आहे, त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एकूण २४ हजार अपूर्ण कामे आहेत. सुरु करण्यात आलेली परंतु अपूर्ण असलेली कामांची संख्या १५,९०० आहे. यामध्ये वृक्ष लागवडीची ३,७०० कामे आहेत तर फळबाग लागवडीची ८,७०० कामे आहेत. वृक्ष लागवडीचा कार्यक्रम दोन वर्षाचा असतो तर फळबाग लागवडीचा कार्यक्रम तीन वर्षाचा असतो तर काही ठिकाणी पाच वर्षाचा असतो. सन २०१०-११ मध्ये कामास सुरुवात केलेली आहे, पुढील वर्षी काम पूर्ण होईल. ही सर्व सुरू असलेली कामे आहेत त्यामुळे ती अपूर्ण वाटतात.

जिल्हयातील काही रस्त्यांची कामे छोट्या कारणांमुळे अपूर्ण राहिलेली असल्याने ही कामे लवकर पूर्ण करण्याकरिता कोणते प्रयत्न सुरु केले आहेत, अशी समितीने विचारणा केली त्यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी अशी माहिती दिली की, एकूण २८० कामे अपूर्ण होती. समितीने भेट दिल्यानंतर पुन्हा कामांचा आढावा घेण्यात आला. आता ५४ कामे पूर्ण झालेली आहेत, १५३ कामे ० ते ५० टक्के प्रोग्रेसमध्ये आहेत, काही ठिकाणी जागा मिळण्यास अडचण आली आहे. मे अखेरपर्यंत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. समितीने विचारले की, १५३ कामे अपूर्ण आहेत, ही कामे पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय, अपूर्ण कामे पूर्ण कशी करण्यात येणार आहे? त्यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, १५३ कामे वेगवेगळ्या स्टेजेसवर सुरु आहेत. ० ते २० टक्के काम पूर्ण असलेल्या कामांची संख्या १२२ आहे. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी कर्मचारीवृंद वाढविला आहे. उप अभियंत्यांची नियुक्ती केलेली आहे. उप जिल्हाधिकारी, रोहयो यानीही असा खुलासा केला की, अपूर्ण कामांचे विश्लेषण करुन दिलेले आहे. कुशल भागाचे काम असेल तर त्याचे पेमेंट करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ठाणे जिल्हयामध्ये मागील चार महिन्यांत ५ हजार ९०० कामे पूर्ण केलेली आहेत. अपूर्ण कामांचा ड्राईव्ह घेतलेला आहे. ठाणे जिल्हयामध्ये सर्वांत चांगले काम झालेले आहे. मागील चार-पाच महिन्यात सहा हजार कामे पूर्ण केलेली आहेत, उर्वरित कामे सार्वजनिक बांधकाम विभागाची आहेत. कुशल कामावरील खर्च करुन मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. समितीने पुढे असे विचारले की, या कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाची किती कामे आहेत? या सर्व कामांची वेगळी माहिती सादर करावी. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाची २८० कामे आहेत. सर्व कामांची वेगळी माहिती देण्यात येईल.

वाडा, विक्रमगड व डहाणू येथील कामांच्या अंदाजपत्रकीय किंमतीस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळून सुरु झालेल्या व बंद झालेल्या कामांची सद्य:स्थिती काय आहे, तसेच कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, या संदर्भात पुस्तकामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. काम सुरु करण्यात आले, परंतु अपूर्ण आहे अशा कामांची संख्या ४२८१ आहे. ही सर्व कामे वृक्ष लागवडीची आणि फळबाग लागवडीसंबंधीची आहेत. ही सर्व कामे तीन वर्षांची असल्यामुळे ती अपूर्ण दिसत आहेत. सिंचन विहिरींची कामे या वर्षी

पूर्ण होतील. वाडा, विक्रमगड आणि डहाणू या तालुक्यातील विहिरींची कामे सुरु झालेली नाहीत, त्याचा आढावा घेण्यात येत आहे. जी कामे सुरु करण्यासारखी असतील ती पूर्ण करण्यात येतील अन्यथा ती कामे बंद करण्यात येतील. सन २०१०-११ मध्ये वृक्ष आणि फळबाग लागवडीची कामे मंजूर झालेली आहेत. या कामांचा कालावधी तीन वर्षांचा आहे. आता ही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे ती अपूर्ण दिसत आहेत. काही ठिकाणी वन विभागाची कामे पाच वर्षांची आहेत.

● अभिप्राय व शिफारशी :

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ठाणे जिल्हयातील रस्त्यांच्या अपूर्ण कामांची संख्या बरीच असल्याचे समितीने ठाणे जिल्हयात दिलेल्या भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले. यंत्रणानी अकुशल कामे अपूर्ण ठेऊन कुशल कामे पूर्ण करून घेतली आहे. त्यामुळे संपूर्ण रस्त्याचे काम अपूर्ण राहणे, त्या रस्त्यांवरून वाहतूक सुरु करता न येणे, लोकांना जाणे-येण्यासाठी या रस्त्यांचा उपयोग करता न येणे, यामुळे झालेला खर्च वाया जाणे, ही कामकाजाची पध्दत रोजगार हमी योजनेला घातक असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. रस्त्यांच्या कामांच्या बाबतीत काही ठराविक रक्कम खर्च करून पुढे काहीच काम न केल्यामुळे शासनाच्या पैश्याचा अपव्यय झाला आहे, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

वरिष्ठ अधिकारी निम्न स्तरावरील माहितीवर अवलंबून राहतात, परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निम्न स्तरावरील माहितीवर अवलंबून न राहता त्यानी संबंधित यंत्रणेबरोबर बसून चर्चा केली पाहिजे तसेच दुसऱ्या यंत्रणेकडे काम वर्ग झाले असेल तर त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हयातील यंत्रणांनी याबाबत काहीही प्रयत्न केले नसल्याने त्यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून आले.

अपुर्ण कामे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. अधिकारी वर्ग या कामात लक्ष घालीत नाहीत त्यामुळे अशी अपुर्ण कामे पूर्ण करण्यास विलंब होतो, परिणामी त्या कामाची किंमत देखील वाढते व अशा वाढीव किंमतीचा भूर्दंड नाहक शासनावर पडतो. म्हणून ज्या वर्षात यंत्रणेने कामे प्रस्तावित केली आहेत व ज्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे अशी कामे त्या-त्या वर्षात पुर्ण करण्यासाठी निधी वापरण्यात यावा, असा समितीचा आग्रह आहे. समितीच्या मते अपूर्ण कामे पूर्ण करण्यासंदर्भात एक कालबध्द कार्यक्रम तयार करून त्यास दिलेल्या मंजुरीनुसार ती तातडीने पूर्ण करण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(६) गैरव्यवहाराची प्रकरणे :-

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर,२०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकांच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "गैरव्यवहाराची प्रकरणे" या संदर्भात समितीने विचारणा केली की, जवाहर विहिरींच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे आणि विभागीय चौकशीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत? उपायुक्त(रोहयो),यानी सांगितले की, ठाणे जिल्हयात जवाहर विहिरींच्या प्रकरणांबाबत १९ विभागीय चौकशींची प्रकरणे सुरु होती. त्यापैकी आठ

प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली आहे, ११ प्रकरणांची चौकशी सुरु आहे, ५ विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडे ही चौकशी सोपविली आहे. शासन स्तरावर अंतिम निर्णयासाठी तीन प्रकरणे पाठविली आहेत, दोन प्रकरणांमध्ये अंतिम निर्णयासाठी दोषारोपपत्र सादर केलेले आहे, एक प्रकरण जिल्हा स्तरावर त्रुटीपूर्ततेसाठी प्रलंबित आहे. यामध्ये नरेगा व रोजगार हमी योजनेच्या प्रकरणांचा समावेश आहे. समितीने असेही स्पष्ट केले की, ११ प्रकरणांची विभागीय चौकशी अद्याप सुरु आहे. विभागीय चौकशीच्या प्रकरणांचा आढावा घेतला आहे की नाही, पाठपुरावा केला जातो की नाही, अधिकाऱ्यांच्या बदल्या होत राहतात, दोषारोपपत्र सादर होईपर्यंत संबंधित अधिकारी वा कर्मचारी सेवानिवृत्त होतात. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्याविरुध्द गंभीरपणे कारवाई करता येत नाही. याबाबत विचारणा केली असता समितीला मग नियम वाचून दाखविला जातो. संबंधित लोक सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांच्याविरुध्द कारवाई होत नाही असा संदेश बाहेर जातो. दोषी अधिकारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांना शासन झाले पाहिजे. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांची वेळेमध्ये कारवाई करण्याची मानसिकता नसते, प्रशासनामध्ये ही मानसिकता असणे आवश्यक आहे. वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सूध्दा वरिष्ठांना सहानुभूती वाटत असते. परंतु वर्ग-२ च्या खालच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली तर होऊ द्या, अशी मानसिकता होऊ लागली तर ते चुकीचे आहे, आतापर्यंत अशा पध्दतीने गोष्टी घडत आहेत. प्रशासनातील प्रत्येक अधिकारी /कर्मचारी आपल्यापेक्षा कनिष्ट व्यक्तीवर अन्याय करतो त्यामध्ये शेवटचा कर्मचारी भरडला जात आहे, हे बरोबर नाही. मधल्या स्तरावरील अधिकारी /कर्मचारी देखील दोषी असू शकतो. चूक असेल तर चूक मान्य करणे उचित होईल.

समितीने पुढे असे सुचित केले की, प्रस्तुत प्रकरणी एक महिन्याच्या आत विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी ही माहिती समितीला सादर करावी. एक महिन्याच्या कालावधीत गुणवत्ता व अनुपालणामध्ये केलेली प्रगती दाखवावी. उपायुक्त, रोहयो यानी यासंदर्भात होकारार्थी उत्तर दिले.

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या वेळी समितीला देण्यात आलेल्या माहितीच्या अनूषंगाने समितीने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, विक्रमगड तालुक्यातील गावांमध्ये विहिरींच्या कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता नसतानाही निधी मंजूर झाल्याचे दर्शविल्याने या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, विक्रमगड तालुक्यामध्ये गट विकास अधिकाऱ्यांनी सरळ आगाऊ रक्कम दिलेली आहे. या संदर्भात उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, नोव्हेंबर महिन्यात आरोपपत्र आल्यानंतर संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. या संदर्भात संबधीतांनी केलेला खुलासा अमान्य करुन चौकशी अधिकाऱ्याकडे प्रकरण पाठविले आहे.

विभागीय अधिकारी यांनी या संदर्भात अशी माहिती दिली की, सन २०१०-११, २०११-१२ मधील सिंचन विहिरींना प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यता नसताना काम सुरु करण्यात आले. त्या संदर्भात ग्रामपंचायतीने आढावा दिला. त्यानुसार गट विकास अधिकारी यांची विभागीय चौकशी सुरु केली आहे, त्यांच्यावर दोषारोप ठेवला आहे. त्यावर समितीने स्पष्ट केले की, प्रकरण गंभीर आहे. प्रस्तुत प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालून काय कारवाई केली ते समितीला सांगावे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, संबंधितांना निलंबित करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. तसेच उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, विभागीय चौकशी अधिकाऱ्याकडे चौकशी करण्यासाठी प्रकरण पाठविले आहे. एकूण ११ प्रकरणे होती,

त्यातील सात प्रकरणे विभागीय चौकशीसाठी आहेत, तीन प्रकरणांची चौकशी पूर्ण झालेली असून ती शासनाकडे मान्यतेसाठी पाठविली आहेत. त्यावर समितीने असे नमूद केले की, जिल्हाधिकारी कार्यालय आणि आयुक्त कार्यालयाने एकत्र बसून प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेतला पाहिजे. प्रकरण जास्त काळ प्रलंबित राहू नये. उप आयुक्त, रोहयो यांनी सांगितले की, दिनांक ३१ मार्च २००६ रोजी विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची पदे रद्द करुन कंत्राटी पध्दतीवर चौकशी अधिकारी नेमले. सन २००६ ते २०१० या काळात काम झालेले नाही. सन २०१० नंतर आठ प्रकरणे अंतिम काढलेली आहेत. त्यातील चार प्रकरणांवर अंतिम निर्णय झालेला आहे. दोन प्रकरणांच्याबाबतीत जिल्हास्तरावर त्रुटी काढण्यात आल्या आहेत.

समितीने विचारणा केली की, अनेक प्रकरणे विभागीय स्तरावर प्रलंबित आहेत त्यासाठी वेगळी यंत्रणा उभारणार काय, चौकशी अधिकाऱ्याची पदे कंत्राटी पध्दतीवर आहेत असे सांगितले, ही चांगली बाब आहे. परंतु खाजगी एजन्सी गंभीरपणे विचार करेल काय? ती कर्मचाऱ्याला पाठिशी घालेल किंवा कसे हा एक संशोधनाचा विषय आहे. ज्यांनी गैरप्रकार केले असतील त्यांना शास्ती मिळत नाही त्यास अनेक कारणे असतील. या संदर्भात विभागीय सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी सांगितले की, रोहयोमध्ये आठ-दहा वर्षे विभागीय चौकशीची अनेक प्रकरणे प्रलंबित होती. यामध्ये निलंबन निधीच्या प्रकरणांची संख्या कमी केलेली आहे. नरेगामध्ये विलंब होऊ नये याची काळजी घेतलेली आहे. प्रकरणे प्रलंबित आहेत हे मान्य करण्यात येत आहे. प्रकरणे निकाली काढण्याच्या कामास गती येणे आवश्यक आहे. कोणतेही प्रकरण एक वर्षात निकाली काढले पाहिजे. समितीने पुढे असे स्पष्ट केले की, गैरप्रकार करणाऱ्या कर्मचाऱ्याला वेळीच शास्ती मिळाली नाही तर आपण काहीही केले तरी लवकर कारवाई होत नाही अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये बळावते, तेव्हा कालबध्द कार्यक्रम आखला पाहिजे.यावर विभागीय सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यानी सांगितले की, विभागीय आयुक्तांना सेक्शन ६ चा अधिकार दिलेला आहे. मराठवाड्यामध्ये जास्त प्रकरणे प्रलंबित आहेत. ही सर्व प्रकरणेजिल्हा पातळीवर प्रलंबित आहेत, ती प्रकरणे आमच्याकडे आलेली नाहीत. एमआयएससारखी ऑन लाईन पध्दत सुरु करता येईल किंवा कसे हे तपासून घेण्यात येत आहे.

● अभिप्राय व शिफारशी :

जिल्ह्यातील गैरव्यवहाराच्या एकूण ११ प्रकरणांपैकी सात प्रकरणे विभागीय चौकशीसाठी आहेत. तीन प्रकरणांची चौकशी पूर्ण झालेली असून ती शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली असल्याने शासनस्तरावर त्यावर त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. त्याचप्रमाणे विभागीय चौकशीसाठी असलेल्या प्रकरणांच्याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय आणि आयुक्त कार्यालयाने एकत्र बसून या प्रकरणाचा आढावा घेऊन प्रकरण जास्त काळ प्रलंबित राहणार नाही याची संबधितानी दक्षता घ्यावी असे समितीचा आग्रह आहे.

विभागीय चौकशीसाठी असलेल्या प्रकरणांच्याबाबतीत आढावा घेतला आहे की नाही अथवा पाठपुरावा केला जातो की नाही याबद्दल समितीला माहिती प्राप्त होऊ शकली नाही. परंतु, यामध्ये समितीच्या असे निदर्शनास आले की, विभागीय चौकशी दरम्यान अधिकाऱ्यांच्या बदल्या होत राहतात, दोषारोपपत्र सादर होईपर्यंत संबंधित अधिकारी वा कर्मचारी सेवानिवृत्त होतात. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्याविरुध्द गंभीरपणे कारवाई करता येत नाही. त्यामुळे संबंधित

अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांच्याविरुध्द कारवाई होत नाही असा संदेश जनमाणसात जातो. ही अतिशय गंभीर बाब आहे. दोषी अधिकारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. विविध स्तरावर प्रलंबित असलेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी, आयुक्त व शासनाने संबंधित यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून निश्चित काल मर्यादेत प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत व या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(७) विहीर कार्यक्रम :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "विहीर कार्यक्रम" या संदर्भात समितीने विचारणा केली की, सिंचन विहिरींच्या कामावरील खर्चाची टक्केवारी एकूण खर्चाच्या ५ टक्के दाखविलेली आहे, त्याचे कारण काय, प्रत्यक्षात सिंचन विहिरींची किती कामे सुरु झाली आहेत? त्या वर्षात किती सिंचन विहिरींना मंजुरी दिली होती, अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांनी सांगितले की, ३,२१३ सिंचन विहिरी आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेल्या आहेत. मागील तीन वर्षापासून सिंचन विहिरी घेतलेल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरावर लाभार्थ्यांनी सिंचन विहिरींची मागणी केलेली होती. त्यात अंदाजित कामांची संख्या नमूद केली होती. सन २०१३-१४ या वर्षातील सिंचन विहिरींची माहिती देण्यात आलेली आहे.

सन २०१३-१४ मध्ये ३,२१३ विहिरींची कामे घेण्यात आली होती असे सांगण्यात आले आहे. परंतु मंजूर विहिरींची संख्या किती होती? असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यानी सांगितले की, ही प्रस्तावित विहिरींची संख्या आहे. मंजूर विहिरींची संख्या माहीत नाही. समितीने पुढे विचारणा केली की, कशाच्या आधारावर संख्या प्रस्तावित केली होती? कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यानी सांगितले की, आराखड्यामध्ये तेवढी कामे घेतली होती. सन २०१३-१४ च्या आराखड्याला मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावरुन मागणी करण्यात आली होती. त्यानुसार ही प्रस्तावित विहिरींची संख्या आहे, मंजूरी दिलेल्या विहिरींची ही संख्या नाही.

सन २०१३-१४ मध्ये किती विहिरी मंजूर केल्या, किती निधी प्राप्त झाला आणि प्रत्यक्षात किती खर्च झाला? ज्या विहिरी प्रस्तावित केलेल्या आहेत त्याचा खर्च एकूण आराखड्याच्या ५ टक्के आहे. सन २०१३-१४ मध्ये एकही सिंचन विहीर मंजूर केलेली नाही व खर्चही केलेला नाही. नियोजनामध्ये ३,२१३ विहिरी प्रस्तावित केलेल्या आहेत. माहे सप्टेंबर, २०१३ पर्यंत ६ महिने झालेले आहेत. या ६ महिन्यामध्ये किती विहिरींना मंजूरी दिली व किती खर्च झाला? अशी समितीने विचारणा केली त्यावर कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यानी

सांगितले की, माहे जून, २०१३ पर्यंत नवीन विहिरींना मान्यता दिलेली नाही. आराखड्यातील हा प्रस्तावित खर्च आहे. अद्यापपर्यंत विहिरींच्या कामांना मान्यता दिलेली नाही. मागील ३ वर्षांतील विहिरींचा कार्यक्रम सुरु आहे.

जिल्हा परिषदेने मागील काळातील कामे सुरु करू नये असे शासनाचे आदेश आहेत काय? सिंचन विहिरींची किती कामे अपूर्ण आहेत, यंत्रणेच्या चुकीमुळे मागील वर्षभरामध्ये कामे पूर्ण झाली नाहीत. त्यामुळे झालेले नुकसान कास्तकारांच्या माथी का मारता, चालू वर्षामध्ये काम करावयाचे नाही असे ठरविले आहे काय? या सहा महिन्यात विहिरी मंजूर केल्या नाहीत, त्यामुळे चालू वर्षाच्या विहिरी अपूर्ण राहतील. त्या केव्हा पूर्ण करणार, असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यानी सांगितले की, माहे मार्च, २०१४ पर्यंत या कामांची मुदत आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, विहिरींच्या कार्यक्रमासाठी भजल सर्व्हेक्षण विभागामार्फत सर्व्हे झाल्यानंतर वैयक्तिक लाभार्थ्यांची निवड केली जाते. त्यानंतरच कार्यक्रम आखला जातो. म्हणून त्यांनी त्याला मान्यता दिली नसावी.

समितीने विचारणा केली की, सन २०११-१२ मध्ये मंजूर विहिरींपैकी १७५४ व सन २०१२-१३ मध्ये १९२६ विहिरींची कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, ज्या विहिरी पूर्ण झाल्या त्याचे पेमेंट झाले काय, किती अपूर्ण विहिरींचे पेमेंट झाले, किती पूर्ण झालेल्या विहिरींचे पेमेंट झाले? याबाबत कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये ठाणे जिल्हापरिषदेमार्फत नरेगामध्ये सिंचन विहिरींचे कामे हाती घेतली होती. एकूण ४४३२ विहिरींना मान्यता देण्यात आली. त्यापैकी २०३२ व ३५० अशा एकूण २३८२ विहिरी सुरु केल्या. त्यापैकी ६६२ विहिरी पूर्ण केलेल्या आहेत, १७२० विहिरी अपूर्ण आहेत, २३४८ विहिरींची कामे अद्याप सुरु झालेली नाहीत. समितीने पुढे विचारणा केली की, सन २०११-१२ मधील विहिरी पूर्ण का झाल्या नाहीत, त्यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांनी सांगितले की, विभागाकडे फक्त २९ शाखा अभियंते आहेत, जास्तीत जास्त विहिरी पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विभागाकडे अभियंते कमी पडतात म्हणून विभागाने पाणी पुरवठा विभागातील अभियंत्यांची मदत घेतली. प्रत्येक शाखा अभियंत्याकडे सात-आठ ग्रामपंचायतीचे वाटप केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना तांत्रिक अधिकारी मानधनावर नेमता येतात. जिल्हाधिकारी कार्यालयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले नाही काय? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यानी सांगितले की, नरेगामध्ये विहिरींची कामे खूप मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली. हया वैयक्तिक लाभाच्या योजनेचा विषय असल्यामुळे विहिरीचे काम केव्हा सुरु करायचे हे लाभार्थ्याने ठरवावयाचे असते. समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्यास ले-आऊट द्यावा लागतो. ले-आऊट दिल्याशिवाय लाभार्थ्यास काम सुरु करता येत नाही. जिल्हा कार्यालयाकडून लाभार्थ्यास ले-आऊट दिले नाही तर तो काम कसे सुरु करणार, २३०० विहिरींची कामे सुरु झाली आहेत काय, जिल्हाधिकाऱ्यांनी मानधनावर मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले पाहिजे अशी तरतूद आहे. त्यावर जिल्हाधिकारी यानी सांगितले की, नरेगाखाली कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंत्यांची नेमणूक केलेली आहे. २८

कनिष्ठ अभियंत्यांकडे तांत्रिक कामे दिलेली आहे. परंतु, त्यांच्याकडे कामाचा भार जास्त आहे. ही बाब त्यांनी आढावा बैठकीत लक्षात आणून दिलेली आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्तरावर कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. तरी देखील विहिरींची कामे सुरु करता आलेली नाहीत.

समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंत्यांनी मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती की नाही? त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, पाणी पुरवठा विभागाने कनिष्ठ अभियंत्यांची पदे काढून घेण्याचे आदेश दिले होते. ठाणे जिल्हयात वेगवेगळ्या विभागात कनिष्ठ अभियंत्यांची २० टक्के पदे रिक्त आहेत. समितीने स्पष्ट केली की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हीच परिस्थिती आहे. परंतु या जिल्ह्यात सन २०११-१२ मधील कामे सन २०१३-१४ या वर्षाचे सहा महिने संपल्यानंतरही पूर्ण होत नाहीत, ही खेदजनक बाब आहे. कामे मंजूर झाली नसती तर समिती समजू शकली असती. परंतु प्रशासनाकडूनच दिरंगाई होत असेल तर ते समिती समजू शकत नाही. देशाने स्वीकारलेली योजना या राज्यात प्रभावीपणे राबविली जात नाही हे दुर्दैव आहे.

वैयक्तिक लाभार्थी योजनेतील विहिरींची कामे पूर्ण झालेली असताना त्यांची देयके प्रलंबित आहेत. त्याचे कारणे काय आहेत, १,७२० विहिरींचे पेमेंट केले आहे काय? अशी समितीने विचारणा केली त्यावर कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यानी सांगितले की, पूर्ण झालेल्या विहिरींची देयके पारित झालेली आहेत. ६६२ विहिरी पूर्ण झाल्या आहेत त्यांचे पेमेंट झालेले आहे. सन २०१२-१३ मध्ये ३३६ विहिरींची कामे पूर्ण केली आहेत. १,९०४ विहिरींचे पार्ट पेमेंट केलेले आहे. पुढे असे समितीने विचारले केली की, १,९०४ विहिरींचे किती टक्के पेमेंट झालेले आहे, त्यावर कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यानी सांगितले की, १,९०४ विहिरींपैकी ५६८ विहिरींचे बांधकाम चालू आहे, या विहिरींची खोदाई पूर्ण झालेली आहे.

सुरुवातीला या योजनेला गती देण्याचा प्रयत्न झाला, त्यावेळी लाभार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. अधिकाऱ्यांनी ती कामे स्वीकारली होती, मंजूरी लवकर देण्यात आली. काही ठिकाणी तर ले-आऊट देण्यापूर्वी कामे सुरु केली आहेत. वर्क ऑर्डर नसताना काम सुरु करावे असे सांगण्यात येते. परंतु नंतरच्या काळात निकष लावून विहिरींच्या कामांची तपासणी करण्याची सुरुवात झाली. भूजल सर्वेक्षण विभागाचा जीएसडीएचा दाखला घेतल्यानंतरच कामाला सुरुवात करण्याची सूचना शासनाने केली. त्यामुळे अडचणींना सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. ग्रामसभेच्या ठरावाचा निकष लावण्यात आला. या सर्व निकषांमुळे या योजनेच्या अंमलबजावणीची गती हळूहळू कमी झाली. काही तालुक्यात विहिरी पूर्ण झाल्या नाहीत तरीही देयके मंजूर करण्यात आली आहेत. जिल्ह्यात विहिरींच्या कामांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे या बाबत खुलासा करण्यात यावा असे समितीने स्पष्ट केले असता, कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद यांनी सांगितले की, विहिरींच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यासंदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्याबाबतची माहिती समितीपर्यंत आली आहे. विहिरी तयार झालेल्या नसताना काही लाभार्थ्यांना पैशाचे वाटप करण्यात आले आहे. काही विहिरींची चोरी झालेली आहे, हे खरे आहे का? कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा

परिषद यांनी सांगितले की, तालुका स्तरावर विहिरी तयार झालेल्या नसताना त्याचे पेमेंट दिले गेले असावे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, विक्रमगड तालुक्यातील गावामधील विहिरींच्या संदर्भात लाभार्थ्यांनी एक वर्षापूर्वी तक्रारी केल्या होत्या, त्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे निदर्शनास आले. या विहिरींच्या कामाची चौकशी करण्यासाठी एक टीम तयार करण्यात आली होती, त्या टीमद्वारे विहिरींची चौकशी केलेली आहे. यामध्ये २-३ चुका झालेल्या आहेत, त्यापैकी एक चूक म्हणजे प्रशासकीय मान्यतेशिवाय कामे सुरु करण्यात आली होती. दुसरी चूक म्हणजे तांत्रिक मान्यता देण्यात आली नव्हती. आदेश नसताना ऑनलाईन सिस्टिममध्ये अनुदान मंजूर झाल्याचे दर्शविले होते. या कामांमध्ये गैरप्रकार आढळल्यामुळे गट विकास अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा व ३६ ग्रामसेवकांवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे दिनांक १८ जानेवारी, २०१३ रोजी पाठविलेला आहे.

सुकसाळे, खडकी, उटावली, देहर्जे या गावातील नागरिकांच्या विहिरींच्या संदर्भात तक्रारी होत्या. मयत झालेल्या तीन लाभार्थ्यांच्या नावावर पैसे घेतलेले आहेत. या सर्व प्रकरणांबाबत सविस्तरपणे चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व त्याचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व लाभार्थ्यांच्या नावांची खात्री करुन घ्यावी व एक महिन्याच्या आत केलेली कार्यवाहीची माहिती समितीला अवगत करावी, असे समितीने सुचित केले. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, या सर्व प्रकरणांची माहिती तपासून घेतलेली आहे. तसेच जिल्हाधिकारी यांनी देखील अशी माहिती दिली की, जानेवारी महिन्यात संबंधित गट विकास अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा व ३६ कर्मचाऱ्यांबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर केलेला आहे. याबाबत उपायुक्त, रोहयो यानी सांगितले की, दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी विभागीय चौकशीसाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून अहवाल प्राप्त झाले आहेत. दिनांक २ मे, २०१३ रोजी ५५ लोकांना नोटिसा निर्गमित केलेल्या असून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून अभिप्राय मागविले आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविलेला आहे. निलंबनाचा निर्णय विभागीय आयुक्तांनी घेतला आहे काय, त्यावर उपायुक्त,रोहयो, कोकण विभाग यांनी सांगितले की, या प्रकरणांमध्ये कनिष्ठ अभियंत्यांची चूक असताना गट विकास अधिकाऱ्यांना जबाबदार धरलेले आहे. ग्रामसेवकांच्या चुकाही त्यांच्या नावे दाखविल्या होत्या. समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागीय आयुक्त किती दिवसात निर्णय घेणार आहेत, यासंदर्भात उपायुक्त, रोहयो कोकण विभाग यांनी सांगितले की, या विहिरींच्या प्रकरणामध्ये १९ अधिकारी व ३६ ग्रामसेवक यांच्या संबंधित आहेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अभिप्राय मागविले आहेत, या सर्वांना २ मे, २०१३ रोजी कारणे दाखवा नोटिसा निर्गमित केलेल्या आहेत.

यासंदर्भात समितीने स्पष्ट केले की, विहिरींच्या कामासंबंधी व पेमेंटसंबंधी गावकऱ्यांच्या तक्रारींची अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्यामुळे लोक गावात उपोषणाला बसले आहेत. बोगस विहिरी दाखवून पैसे घेण्यात

आले आहेत, मयत व्यक्तींच्या नावे पैसे घेतले आहेत. अशा प्रकारचे निवेदन समितीकडे प्राप्त झालेले आहे. याबाबतची डेटा एन्ट्री चुकून झाली असावी असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले होते. या विहिरींच्या कामांची कागदपत्रे ग्रामपंचायतीला सादर झाल्यानंतरच डेटा एन्ट्री झाली असेल. त्यानंतर देयक तयार करण्यात आले असेल, हा गैरव्यवहार आहे. त्यामुळे फसवणुकीच्या केसेस दाखल होऊ शकतात. विभागीय आयुक्त कार्यालयाला माहे मार्च, २०१३ मध्ये विभागीय चौकशीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मे महिन्यात कारणे दाखवा नोटिसा निर्गमित केल्या आहेत. संबंधितांकडून एक महिन्याच्या आत खुलासा प्राप्त करुन घेणे अपेक्षित होते. म्हणजे या कार्यवाहीला विलंब झालेला आहे.

समितीच्या दिनांक ४ व ५ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या वेळी समितीला देण्यात आलेल्या माहितीच्या अनूषंगाने समितीने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सन २०१३-२०१४ या वर्षात एकही सिंचन विहिरी मंजूर करण्यात आली नाही, याची कारणे काय आहेत? सद्य:स्थितीत किती विहिरी अपूर्ण आहेत व किती विहिरी पूर्ण होणे अपेक्षित आहे त्या विहिरींसाठी किती निधी प्राप्त झाला व प्रत्यक्षात किती खर्च झाला याची सविस्तर माहिती द्यावी याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सन २०११ ते २०१३ या दोन वर्षात एकूण ४८१२ सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी २६२५ सिंचन विहिरी सुरु करण्यात आल्या त्यापैकी ८०२ सिंचन विहिरी पूर्ण झाल्या आणि १८२३ सिंचन विहिरी अपूर्ण आहेत. सदरच्या अपूर्ण असलेल्या सिंचन विहिरींची संख्या जास्त असल्याने तसेच ग्रामपंचायत स्तरावर अकुशल व कुशल खर्चाची ६०:४० चे प्रमाण राखण्यासाठी सन २०१३-२०१४ या वर्षात सिंचन विहिरी मंजूर करण्यात आलेल्या नाहीत. सदरच्या योजनेअंतर्गत कामनिहाय निधी प्राप्त होत नाही, पंरतु झालेल्या कामाच्या प्रमाणानुसार खर्च करण्यात येतो. प्रत्यक्षात सिंचन विहिरींच्या कामांवर रक्कम रुपये २०७२.८० लाख रुपये खर्च झालेला आहे.

समितीने विचारणा केली की, दोन वर्षांमध्ये जवळ जवळ ५,००० विहिरींना प्रशासकीय मान्यता देऊन प्रत्यक्षात मात्र ८०० विहिरीच पुर्ण होतात. पुढील विहित कालावधीमध्ये उर्वरित सर्व प्रशासकीय मान्यता मिळालेल्या विहिरी कशा पूर्ण होतील, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितले की, ग्रामपंचायत स्तरावर अकुशल व कुशल खर्चाकरिता ६०:४० हा निकष आहे. उर्वरित विहिरींच्या कामांना या निकषानुसार हात लावता येणार नाही. ज्या गावांमध्ये ८०:२० असा निकष आहे त्या गावांमधील सिंचन विहिरी पूर्ण होण्याचा हिशोब काढलेला आहे यानुसार ८० ग्रामपंचायतींमध्ये ६०:४० क्रॉस झालेले आहे. याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, या हिशोबाप्रमाणे पाच हजार विहिरींपैकी जास्तीत जास्त विहिरींचे काम पूढे जाऊ शकणार नाही. त्यावर विभागीय सचिव यानी सांगितले की, सिंचन विहिरी हा सर्वांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. नरेगा योजनेचे विस्तारीकरण झाल्यानंतर ३० हजार विहिरींचे काम पूर्ण झालेले आहे. ७० हजार विहिरींचे काम प्रगती पथावर आहे. या वर्षीही सिंचन विहिरी पूर्ण करण्याची धडक मोहीम हाती घेण्यात आलेली आहे तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक

सूचनांप्रमाणे ठराविक झोनमध्येच विहिरींचे बांधकाम करता येणार आहे. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे विहिरींची जागा निश्चित करुन मग प्रशासकीय मान्यता मिळालेल्या विहिरींचे काम पूर्ण करावे लागणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितले की, भूजल नियोजन कायद्याप्रमाणे आता जलस्त्रोत विकासाच्या कामांमध्ये अडचणी निर्माण होणार आहे. भूजल सर्वेक्षणामध्ये भूजल पातळी कमी होत आहे, याकरिता भूमिगत जलस्त्रोत निर्मितीच्या कामांवर नियंत्रण आणणे क्रमप्राप्त झालेले आहे. तसेच विभागीय सचिव यानी असे स्पष्ट केले की, नरेगाच्या माध्यमातून सिंचन विहिरींची धडक मोहीम ही योजना यशस्वी म्हणून जनमाणसांमध्ये गणली जाते, या योजनेला अपयश आलेले नाही.

- **अभिप्राय व शिफारशी :**

जिल्ह्यात नरेगा अंतर्गत सिंचन विहिरींची कामे मोठ्या प्रमाणात घेण्यात आली आहेत. मात्र ज्या प्रमाणात विहिरीना मान्यता देण्यात आली त्याप्रमाणात विहिरींची कामे सुरू करण्यात आली नाहीत तसेच सन २०११-१२ मधील कामे सन २०१३-१४ मध्येही पूर्ण झालेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. वास्तविकत: शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता केल्यानंतरच विहिरीच्या कामाला सुरवात केली पाहिजे. परंतु, जिल्हयात सुरूवातीला या योजनेला गती देण्याचा प्रयत्न करताना मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. याबाबत दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यावर सुरू करण्यात आलेली कारवाई अद्याप अंतिम टप्प्यात आलेली नसल्याने समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. तसेच विहिरींच्या कामासंबंधी व पेमेंटसंबंधी गावकऱ्यांनी अनेक तक्रारी केल्या आहेत, परंतु,संबंधीत अधिकाऱ्यानी दखल न घेतल्यामुळे गावातील लोक उपोषणाला बसले. बोगस विहिरी दाखवून पैसे घेणे, मयत व्यक्तीच्या नावे पैसे घेणे याबाबत समितीकडे निवेदन प्राप्त झाल्यानंतर समितीने चौकशी केली असता प्रस्तुत प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे संबंधित अधिकाऱ्यानी मान्य केले. तथापि, यासंदर्भात दोषींवर करण्यात येत असलेल्या कारवाईस विलंब होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरी संबंधीत दोषी अधिकाऱ्यावर तात्काळ योग्यती कारवाई करण्यात यावी. तसेच जिल्हयात मान्यता देण्यात आलेल्या व आवश्यकत्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आलेल्या सिंचन विहिरींच्या कामांचा आढावा घेऊन त्या लवकरात लवकर पूर्ण करण्याचा सबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

सोमवार, दिनांक ४ सप्टेंबर,२०१३

समितीची अनौपचारिक बैठक शासकीय विश्रामगृह, **ठाणे** येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :-

समिती प्रमुख:

१. ॲड.सदाशिवराव पाटील, वि.स.स.

समिती सदस्य:

२. श्री अनिल बावनकर, वि.स.स.
३. श्री ओमप्रकाश पोकर्णा वि.स.स.
४. श्री राहुल बोंद्रे, वि.स.स.
५. श्री दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
६. श्री वसंतराव चव्हाण, वि.स.स.
७. श्री राहुल मोटे,वि.स.स.,
८. श्री दिलीप वाघ, वि.स.स.
९. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
१०. श्री हरिष पिंपळे, वि.स.स.
११. ॲड.आशिष जयस्वाल
१२. कॅप्टन अभिजित अडसूळ, वि.स.स.
१३. श्री विजयराज शिंदे, वि.स.स.
१४. श्री सुभाष चव्हाण, वि.प.स.
१५. श्री वसंतराव खोटरे, वि.प.स.
१६. श्री रमेश शेंडगे, वि.प.स.
१७. श्री भगवानराव साळुंखे, वि. प.स.
१८. डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

श्री. म.मु. काज, उप सचिव.
श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती),
श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव, (समिती).

नियोजन विभाग (रोहयो) मंत्रालय मुंबई.

श्री संतोष नवगिरे कक्ष अधिकारी.

जिल्हाधिकारी कार्यालय

(१) श्री पी. वेलरासु,जिल्हाधिकारी, ठाणे
(२) श्री अशोक शिनगारे, अप्पर जिल्हाधिकारी, (रोहयो).
(३) श्री शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
(४) श्रीमती प्रशाली जाधव-दिघावकर, उप जिल्हिाधिकारी.

स्थानिक लोकप्रतिनिधी :-
(१) श्री. किसन कथोरे, वि.स.स.
(२) श्री. विलास तरे, वि.स.स.
(३) ॲड. निरंजन डावखरे वि.प.स.

सदरहू बैठकीत समितीने ठाणे जिल्ह्यात सुरु असलेल्या कामांबाबत चर्चा केली व त्यानंतर समितीने जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांना भेटी दिल्या.

गुरुवार, दिनांक ५ सप्टेंबर, २०१३

समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, ठणे येथे घेण्यात आली आहे. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख:

१. ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

समिती सदस्य:

२. श्री अनिल बावनकर, वि.स.स.
३. श्री ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स
४. श्री राहुल बोंद्रे, वि.स.स.
५. श्री दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
६. श्री राहुल मोटे, वि.स.स
७. श्री दिलीप वाघ, वि.स.स
८. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.
९. श्री हरिष पिंपळे, वि.स.स.
१०. ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
११. कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.
१२. श्री विजयराज शिंदे, वि.स.स.
१३. श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
१४. श्री वसंतराव खोटरे, वि.प.स.
१५. श्री रमेश शेंडगे, वि.प.स.
१६. डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. म.मु.काज, उप सचिव

(२) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव(समिती)
(३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

<u>नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय</u>

श्री. मनोहर सावंत, कक्ष अधिकारी

विभागीय आयुक्त कार्यालय,कोकण विभाग

श्री. दत्तात्रय डोईफोडे, उपायुक्त (रोहयो)

ठाणे जिल्ह्यातील अधिकारी:-

(१) श्री पी. वेलरासु, जिल्हाधिकारी
(२) श्री शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी
(४) श्रीमती प्रशाली जाधव-दिघावकर, उप जिल्हाधिकारी (रोहयो)
(५) श्री रवींद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(६) श्री अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(७) श्री आर.के. जवंजाळ, अघीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ
(८) श्री सु.मा.घाडगे, कृषी विकास अधिकारी
(९) डॉ. अ.भ.गंधे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१०) डॉ. क्लेमेंट बेन, उप वनसंरक्षक, जव्हार, वन विभाग, जव्हार
(११) श्री सतिश फले, उप संचालक, सामाजिक वनीकरण
(१२) श्री पी.बी.संधाण, विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, डहाणू
(१३) श्री बी.टी.भगत, विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग
(१४) श्री महावीर जंगटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी
(१५) श्री अं.रा.परहर, कार्यकारी अभियंता, विभागीय आयुक्त कार्यालय (रोहयो)
(१६) श्री गजेंद्र नरवणे, उप वनसंरक्षक
(१७) श्री जी.मल्लिकार्जुन, उप वनसंरक्षक, डाहाणू
(१८) श्री हरिश्चंद्र पाटील, उप विभागीय अधिकारी, वाडा
(१९) श्री बी.जी.गावंडे, उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर
(२०) डॉ. दादाराव दातकर, उप विभागीय अधिकारी, वसई
(२१) श्री धनंजय सावळकर, उप विभागीय अधिकारी, कल्याण
(२२) डॉ. नवनाथ जरे, उप विभागीय अधिकारी, भिवंडी
(२३) श्री माधव शंकमाळे, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., जव्हार

(२४) श्री सलिम शेख, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.

(२५) श्री देवेंद्र पवार, कार्यकारी अभियंता, जि.प.बां. (पूर्व)

(२६) श्री विजय देवराज, कार्यकारी अभियंता, ल.पा.जि.प.

(२७) श्री एन.जी.मंडलिक, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड

(२८) श्री टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कल्याण

(२९) श्री आर.जी.धुम, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा

(३०) श्रीमती चित्रलेखा कोठावळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर

(३१) श्री अशोक सोनटक्के, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, विक्रमगड

(३२) श्रीमती नलिनी अप्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालघर

(३३) श्री निखिल ओसवाल, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तलासरी

(३४) श्री व्ही.एल.वरठा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, डहाणू

(३५) श्रीमती एस.एस.कुलकर्णी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसई

(३६) श्री शेखर सावंत, गट विकास अधिकारी, जव्हार

(३७) श्री ए.व्ही.थुळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मोखाडा

(३८) श्री प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबरनाथ

(३९) डॉ. करूणा जुईकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी

(४०) श्री अजय पाटील, तालुका कृषी अधिकारी, शहापूर

(४१) श्री व्ही.व्ही.बर्वे, तालुका कृषी अधिकारी, कल्याण

(४२) श्री डी.सी.मोरे, तालुका कृषी अधिकारी, जव्हार

(४३) श्री ए.पी.निकुंभ, तालुका कृषी अधिकारी, मोखाडा

(४४) श्री व्ही.पी.पाटील, तालुका कृषी अधिकारी, उल्हासनगर

(४५) श्री संतोष पवार, तालुका कृषी अधिकारी, पालघर

(४६) श्री विकास पाटील, तहसीलदार, ठाणे

(४७) श्री शेखर घाडगे, तहसीलदार, कल्याण

(४८) श्री बाळासाहेब खांडेकर, तहसीलदार, अंबरनाथ

(४९) श्री एस.डी. शिंदे, तहसीलदार, भिवंडी

(५०) श्री राजेंद्र चव्हाण, तहसीलदार, वसइ

(५१) श्री दिलीप संखे, तहसीलदार, वाडा

(५२) श्री महेश सागर, तहसीलदार, डहाणू

(५३) श्री गणेश सांगळे, तहसीलदार, तलासरी

(५४) श्री प्रशांत जोशी, तहसीलदार, मुरबाड

(५५) श्री एस.जे.माने, उप अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, कळवा आणि इतर

या बैठकीत ठाणे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामातील अडचणी व उणिवा तसेच रोहयोच्या कामांना भेटी दिल्यानंतर आढळून आलेल्या त्रुटीबाबत जिल्हाधिकारी व ही योजना राबविणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणांचे अधिकारी यांच्याशी समितीने चर्चा केली व समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भात जिल्हाधिकारी व रोजगार हमी योजनेशी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेचे प्रमुख यांच्याशी चर्चा केली.

बुधवार, दिनांक २२ जानेवारी, २०१४

बुधवार, दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी दुपारी २.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे समितीची बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख :

(१) ॲड.सदाशिवराव पाटील, वि.स.स.

समिती सदस्य :

(२) श्री.अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(४) श्री.हरिष पिंपळे, वि.स.स.
(५) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स.
(६) श्री.विजयराज शिंदे, वि.स.स.
(७) श्री.नितीन भोसले, वि.स.स.
(८) श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स.
(९) श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
(१०) श्री.सुमंत गायकवाड, वि.प.स.
(११) श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. निमंत्रित

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन

(१) श्री.देशमुख, सह आयुक्त
(२) श्री.द.सं.डोईफोडे, उपायुक्त

विभागीय प्रतिनिधी

(१) श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो
(२) श्री.व.कृ.पाटील, उप सचिव, रोहयो

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

(१) श्री.पी.वेलरासू, जिल्हाधिकारी
(२) श्री.अशोक शिनगारे, अतिरिक्त जिल्हाधिकारी
(३) श्रीमती प्रशाली जाधव-दिघावकर,उप जिल्हाधिकारी(रोहयो)
(४) श्री.ज.सं.वाघमारे, कार्यकारी अभियंता ल.सि.

जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे

(१) श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता, (पश्चिम)
(३) श्री.देवेंद्र पवार, कार्यकारी अभियंता (पूर्व)
(४) श्री.संजय निकुडे, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.
(५) श्री.निलेश दुसाने, कार्यकारी अभियंता,
(६) श्री.सलीम शेख, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.ठाणे
(७) श्री.माधव शंखपाळे, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.जव्हार व इतर संबंधित अधिकारी

या बैठकीत ठाणे जिल्ह्यातील रोहयोंच्या कामासंबंधात ठाणे जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनाबाबत व त्या संदर्भातील समितीच्या प्रश्नावलीनुसार नियोजन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

गुरूवार, दिनांक १६ जुलै, २०१५

रोजगार हमी योजना समितीची बैठक गुरूवार, दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता विधान भवन मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख :

(१) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

समिती सदस्य :

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(३) श्री सुरेश हाळवणकर, वि.स.स.
(४) श्री. कृष्णा खोपडे,वि.स.स.
(५) श्री.प्रशांत बंब, वि.स.स.
(६) श्री.सुभाष देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(८) डॉ. संतोष दानवे, वि.स.स.
(९) श्री. संदिपानराव भुमरे, वि.स.स.
(१०) श्री.सदानंद चव्हाण वि.स.स.
(११) श्री. नारायण पाटील, वि.स.स.
(१२) डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स.
(१३) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
(१४) ॲड.राहूल कुल, वि.स.स.
(१५) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(१६) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(१७) श्री.आनंदराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. म. मु. काज, सह सचिव(२).

(२) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव.

दिनांक १६ जुलै, २०१५ रोजीच्या बैठकीत समितीने ठाणे जिल्हयासंदर्भातील प्रारुप अहवालावर विचार करुन आवश्यक त्या सुधारणांसह संमत केला.